# MOBY DICK

HERMAN MELVILLE

वृषाली जोशी



# मॉबी डिक

# मॉबी डिक

## लेखक- Herman Melville

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# मॉबी डिक

लेखक - Herman Melville

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१९७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २९ फेब्रुवारी २०२४



©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


# Moby Dick

## By Herman Melville

## मॉबी डिक

# प्रकरण १

# विचित्र साथीदार



The Sea Restores Ishmael's Spirits.

मला इस्माईल म्हणा. मी शाळाशिक्षक आहे. जेव्हा जेव्हा मला आयुष्य आनंदी वाटत नाही, तेव्हा मी माझे काम सोडून, कुठेतरी विशेष ठिकाणी जातो.

जेव्हा मला माझ्या आत्म्याला पुनरुज्जीवित करायचे असते, तेव्हा मी समुद्रसफरीवर जातो. म्हणजे मी उतारू म्हणून जातो, असे नव्हे. नाही, न्यूयॉर्क, मॅनहॅटनमधील माझ्या त्याच त्याच आयुष्यापासून, सुटका करून घेऊन मी खलाशी म्हणून दर्यावर्दी बनतो. मला व्यायाम आवडतो. पैसे घालवण्यापेक्षा

मिळवलेले मला आवडतात. लांबलांबची ठिकाणे बघून मला इच्छापूर्तीचे समाधान मिळते.

यावेळेस व्यापारी बोटीवर जाण्यापेक्षा मी व्हेलची शिकार करणाऱ्या बोटीवर जायचे ठरवले. व्हेल माशांच्या घरापासून, म्हणजे नान्टुकेट या मॅसॅच्युसेटच्या किनाऱ्यावरील बेटापासून सुटणाऱ्या बोटीवर जायचे मी ठरवले. मला प्रथम न्यू बेडफोर्डला जावे लागले व तेथून लहान बोटीने मी नान्टुकेटला गेलो.

मी डिसेंबरधील एका अतिशय थंडीच्या शनिवारी रात्री न्यू बेडफोर्डला पोचलो. पण तिथे मला एक वाईट बातमी समजली. नान्टुकेटची शेवटची बोट नुकतीच सुटली होती आणि सोमवार सकाळपर्यंत दुसरी बोट येणार नव्हती. दोन रात्री न्यू बेडफोर्डला रहाण्याइतके पैसे बाळगायचा माझा बेत नव्हता. पण दुसरे काही करणे शक्य नव्हते. त्यामुळे मी आसपास एखादी स्वस्तातली खानावळ शोधू लागलो. मी जात होतो त्या रस्त्यावरील एक खानावळ माझ्या खिशाला चांगली व आकर्षक वाटली. मी बर्फाळ वाऱ्यात फिरत राहिलो. धक्क्याजवळ एक दोन्ही बाजूला उतरत्या छपराचे मोडकेतोडके घर दिसले. डुगडुगत्या दारावर, त्या घराचा करकर असा आवाज येत होता. जेटच्या फवाऱ्याच्या चित्राखाली, ‘स्पॉउटर खानावळ --- पीटर कॉफिन’ असे शब्द दिसत होते.

मी विचार केला, ‘फार चांगली दिसत नाही, पण या बर्फाळ रात्री बाहेर रहाण्यापेक्षा केव्हाही बरी!’

मी तिथे आत शिरल्यावर पहिले काय पाहीले असेल, तर एका बुडणाऱ्या जहाजाचे व व्हेलचे चित्र! एका भिंतीवर थरकाप उडवणारी शस्त्रास्त्रे लटकवलेली होती. काठी, सहा फूटी लोखंडी भाले आणि हार्पून म्हणजे दोरी बांधलेली, हाताने फेकून मारायची किंवा बंदुकीतून व्हेलमध्ये खुपसायची गंजकी, टोकेरी हत्यारे ही सर्व तिथे होती. व्हेलच्या उघड्या तोंडाच्या कमानीने बारमध्ये जाण्याचे प्रवेशद्वार होते. बारमधील अंगावर सुरकुत्या पडलेला वेटर व्हेलच्या भयानक जबड्याच्या आत निरनिराळी पेये मिसळत होता.

खानावळीचा मालक बोलला, की खानावळ पूर्ण भरलेली आहे. पण तुम्हाला रहायचेच असेल तर एका हार्पूनरबरोबर खोली वाटून घ्यावी लागेल. मला ही कल्पना काही फारशी पसंत पडली नाही. पण लहान गावात अशी पद्धत असल्याचे मला माहिती होते. जर नाईलाज असेल, तर मी एखाद्या सभ्य माणसाबरोबर माझे पांघरूण वाटून घ्यायला तयार आहे. जेवण करतांना मी हार्पूनर येण्याची वाट बघत होतो, पण तो काही आला नाही.

एका विचित्र गावात, विचित्र अंथरुणात, एका विचित्र पूर्णपणे अनोळखी माणसाबरोबर झोपायच्या विचाराने माझा थरकाप होत होता. विशेषतः एका रांगड्या हार्पूनरबरोबर! मी मध्यरात्रीपर्यंत काळजीने दाराकडे बघत राहीलो, पण त्याचे काही येण्याचे चिन्ह दिसेना.

शेवटी मी मालकाला विचारले, “तो कुठे आहे? इतक्या रात्री येणारा, तो कुठल्या प्रकारचा माणूस आहे?”

“सहसा तो सकाळी लवकर येणारा प्राणी आहे. पण आज रात्री तो गुन्हेगारांना गाढवावर बसवून, वल्ह्याने फटके देण्याच्या कामगिरीत गुंतलेला आहे. तो प्रेतांच्या मुंडक्यांच्या माळेची विक्री करण्यात सफल झालेला दिसत नाही.”

“कसली विक्री?

मालक म्हणाला, “घाबरू नका. हा हार्पूनर आताच दक्षिणेकडील समुद्रावरून आलेला आहे. त्याने न्यूझीलंडवरून आणलेली इंजेक्शन देऊन टिकवलेली खूपशी सुकलेली डोकी आणली आहेत. तुम्ही त्याबद्दल नक्कीच चौकस असाल. त्याने, एक सोडून, ती सगळी विकली. मी त्याला सांगितले आहे, की उद्या जेव्हा लोक चर्चमध्ये जात असतील तेव्हा रस्त्यावर तो मानवी डोके विकू शकणार नाही.”

मी ओरडलो, “तो धोकादायक मनुष्य दिसतो आहे. मालक मेणबत्ती लावत बोलला, “तो नियमितपणे इथे रहाण्याचे पैसे भरतो आणि मला तेवढेच हवे असते. आता चल. मी तुला तुझ्या खोलीत नेतो.”

विचित्र, म्हातारा, रुंद छातीचा मनुष्य लहानशा थंड खोलीत उभा होता आणि मध्यभागी चार हार्पूनर मावतील, एवढा मोठा पलंग होता. तिथे एक अशीतशी मांडणी व एक जुनाट लाकडी खुर्ची सोडून काही फर्निचर नव्हते. जमिनीवर त्या खलाशाची बॅग पडली होती. आणि एक उंच हार्पून पलंगाशेजारी उभे केलेले होते.

मालक गेल्यावर, थोडा वेळ मी अस्वस्थ होतो. शेवटी मी कसाबसा हलक्या झोपेच्या आधीन झालो. अचानक पॅसेजमधून जोराने आलेल्या पदरवाने मी जागा झालो. मला खोलीत उजेडाची तिरीप येतांना दिसली.

मी म्हणालो, “देवा रे, मला वाचव. तो मुंडक्यांच्या माळा विकणारा येतो आहे.”

मी स्तब्ध राहीलो. न्यूझीलंडवरून समुद्रबॅगेत भरून आणलेली भयानक मुंडकी घेऊन येणाऱ्या आकृतीची सावली मी बघत राहिलो. त्याने त्याचा जड समुद्रकोट खुर्चीवर टाकला. बॅगजवळ जाऊन, कुदळीसारखे दिसणारे शस्त्र बाहेर काढले. मी त्या माणसाचा चेहरा बघू शकत नव्हतो. पण तो दिसल्यावर मी गोठून गेलो.

तो चेहरा गडद जांभळसर रंगाचा होता. त्यावर जिकडेतिकडे मोठे काळे चौकोन होते आणि जेव्हा त्याने त्याची टोपी ओढून काढली, तेव्हा मी आश्चर्याने रडायला आलो. त्याच्या डोक्यावर केस नव्हते --- फक्त मध्यभागी केस ठेऊन, लहानशी, पीळ बसलेली शेंडी होती. त्याचे टक्कल असलेले जांभळसर डोके शेवाळ्याने भरलेले होते.

तो पाहुणा माझ्या व दाराच्या मध्ये उभा नसता, तर मी घाईने दाराची कडी काढून भीतीने बाहेर पळून गेलो असतो. पण मी तिथे थांबून राहिलो. शांतपणे त्याच्याकडे तो अजून कायकाय करतो, ते बघत राहिलो.


त्याची छाती. हात आणि पाठ यावर चेहऱ्यासारखेच मोठे काळे चौकोन काढलेले होते. कोवळ्या पामच्या झाडांच्या खोडांवरून गडद हिरव्या रंगाच्या

बेडकांची फौज चालली आहे की काय, असे वाटणारे टॅटू [चित्रे] त्याच्या पायांवर सर्वत्र काढलेली होती.

त्याने त्याचा जड समुद्रकोट जिथे टाकला होता, तिथे तो विचित्र पाहुणा पोचला. त्याने खिशातून लहानशी कुबड आलेली आकृती काढली. प्रार्थना करायची मूर्ती, मूठभर लाकडाचे बारीक तुकडे, एक मेणबत्ती, थोडीशी जहाजावरील बिस्किटेदेखील काढली. हे सर्व त्याने शेकोटीवरील भिंतीवर रचून ठेवले. मग त्याने एक प्रकारची त्यागज्योत पेटवून बिस्कीट जाळले. त्या लहानशा मूर्तीला त्याने नम्रपणे तो प्रसाद अर्पण केला. त्याचा चेहरा अनैसर्गिकपणे, धक्का बसल्यासारखा झाला. तो घशातून काही विचित्र आवाज काढू लागला. तो काही समारंभपूर्वक, त्या मूर्तीची पूजा करू लागला. मी अवाक् होऊन फक्त बघत राहीलो.

# प्रकरण २

## जीवनभराचा मित्र


"Don't Be Afraid of Queequeg."

शेवटी त्या विचित्र माणसाने, तो लहानसा अग्नी विझवला व ती मूर्ती परत कोटाच्या खिशात ठेऊन दिली. मी बोलायचा विचार करत होतो पण मी काही बोलू शकणयापूर्वी, त्याने अचानक तो सिगरेट ओढायचा पाईप आणि शस्त्र असे एकत्र असलेले काही त्याच्या दातात धरले. एक पेटलेली काडी तिथपर्यंत आणली आणि तंबाखूचा जोरदार झुरका घेऊन, मी जेव्हा काही बोललो, तेव्हा तो आश्चर्यचकित झाला. मग त्याने पलंगावर उडी मारली. मी ततपप करत शरीराची गुंडाळी करत भिंतीकडे सरकलो. तो ओरडू लागला आणि सगळीकडे राख उडवत, ती कुबड आलेली, वाकलेली मूर्ती हलवू लागला. तो मला कापेल की काय म्हणून व पलंगाला आग लावेल की काय म्हणून, मला भीती वाटू लागली.

तो किंचाळला, "तू --- कोण राक्षस आहेस का? बोल, नाहीतर मी तुला मारून टाकेन."

मी मालकाच्या नावाने किंचाळलो. नशीबाने तो त्याच्या हातात विजेरी घेऊन ताबडतोब आला.

उघड्या दारातून तो म्हणाला, "घाबरू नकोस. क्विक्वेग तुझ्या केसालाही धक्का लावणार नाही."

मी गरजलो, "हा हार्पूनर नरभक्षक असल्याचे तुम्ही मला आधी का सांगितले नाही?"

"मला वाटले, तुम्हाला माहिती आहे. मी तुला सांगितले नाही का, की तो गुन्हेगारांना गाढवावर बसवून, वल्ह्याने फटके देण्याच्या कामगिरीत व मुंडकी विकण्याचा कामात गुंतलेला आहे." तो क्विक्वेगकडे वळून बोलला, "इकडे बघ. अरे शहाण्या माणसा, हा मनुष्य तुझे अंथरूण वाटून घेणार आहे."

त्याच्या पाइपमधून धूर सोडत, क्विक्वेग गुरगुरला, "मी शहाणा माणूस!"

त्याने नम्रपणे पाइप विझवला व मला अंथरुणात घालवण्यासाठी हलला."

मी त्याच्याकडे नीट पाहीले. मला कळून चुकले की सर्व रंगरंगोटी खाली तो खरेच एक शहाणा माणूस होता. मी त्याला घाबरत होतो तसेच बहुधा तोही मला घाबरत होता.

मी बोललो, "ठीक आहे, मालक. पण त्याला ते कुदळीसारखे दिसणारे शस्त्र लांब ठेवायला आणि धूम्रपान बंद करायला सांगा."

क्विक्वेग त्यासाठी सहज तयार झाला आणि जणू काही म्हणण्यासाठी एका बाजूला जात बोलला, "तुला माझ्यापासून काही भीती नाही."

मी बोललो, "मालक, शुभरात्र! तुम्ही जाऊ शकता."

दुसऱ्या दिवशी सकाळी क्विक्वेगने सांगितले, की पहिल्यांदा तो कपडे करेल आणि मग खोली माझ्या ताब्यात देईल. माझा खोलीतील सहकारी नम्र होता. तो त्याची मोठ्या कडा असलेली व पाण्याने फारशी न भिजणारी टोपी घालत असतांना मी त्याच्या कडे निरखून बघणे थांबवू शकलो नाही. मग त्याने पलंगाखाली जाऊन, गुप्तपणे त्याचे बूट घातले. मग तो त्याची पँट व शर्ट घालण्यासाठी, रांगत बाहेर आला.

मग त्याने साबणाचा ओला तुकडा घेतला. आणि त्याचा चेहरा धुऊ लागला. मला नवल वाटले, की त्याच्याकडे कुठल्या प्रकारचा रेझर होता. पण लगेचच मला समजले व अतिशय आश्चर्य वाटले, की त्याने लांब भाल्यातून त्याचे टोक बाहेर काढून ते बुटावर घासून धार केली आणि जोरजोराने त्याचे गाल भादरून काढले. मला त्यावेळी ते नवलपूर्ण वाटले, पण नंतर जेव्हा मला समजले, की त्या भाल्यांचे टोक किती धारदार ठेवले जाते, तेव्हा मला ते तसे वाटेनासे झाले.

न्याहारीच्या वेळी मला सर्व अनुभवी व्हेलर्सकडून समुद्रावरील रोमहर्षक गोष्टी ऐकायला मिळतील, असे वाटले होते, पण ते शांत होते. ती लाजाळू अस्वले होती.

क्विक्वेग जरी फार कामात होता, तरी त्याने कॉफी आणि खायच्च्या इतर पदार्थांकडे लक्ष द्यायचे सोडून, त्याचा हार्पून न्याहारीच्या टेबलावर आडवा टाकून, एकामागोमाग एक गाईचे मास आणून, त्याचे सटासट तुकडे कापायला सुरवात केली. हे अगदी क्वचित दिसणारे दृष्य होते.

नंतर तिथे त्याच्याबरोबर मी एकटाच राहीलो. त्याने त्याच्या टेबलावरून एक जड पुस्तक उचलले आणि त्याच्या विचित्र भाषेत सावकाश त्याची पाने मोजू लागला. प्रत्येक पन्नास पानानंतर तो थांबून किती पाने आहेत, अशा आश्चर्याने शिट्टी वाजवे व परत मोजणे चालू करे. खाणावळीतील इतर खलाशांबरोबर तो मित्रत्वाने का वागत नव्हता, याचे मला नवल वाटले. पण परत विचार केल्यावर मला त्याचे ते वागणे आवडले. न्यूझीलंडपासून इथे, म्हणजे त्याच्या घ्ररापासून, वीस हजार मैलांवर तो माणूस होता. इथे त्याला दूर गुरुग्रहावर उतरल्यासारखे, परदेशात असल्यासारखेच होते.

तरी त्याने स्वतःला इथे सहजपणे वावरायची सवय लाऊन घेतली होती. तो स्वतःतच दंग असायचा. मला मी त्याच्याकडे आकृष्ट झाल्यासारखे वाटले. त्यामुळे मी माझा बाक ओढला व त्याच्याशी बोलायचा मनापासून प्रयत्न करू लागलो. त्याने मला विचारले, की आज रात्री पण आपण दोघांनी ही खोली वापरायची आहे का? जेव्हा मी हो म्हणालो, तेव्हा मी त्याला टाळत नसल्याने तो खूश झालेला दिसला.

त्याने हातात धरलेल्या पुस्तकाबद्दल मी थोडे स्पष्टीकरण देऊ लागलो --- ते कसे छापले आहे आणि त्यातील चित्रांचा अर्थ काय आहे. जेव्हा मी

सिगरेट ओढण्याबद्दल सूचक भाष्य केले, तेव्हा त्याने त्याची तंबाखूची पुरचुंडी काढली आणि सिगरेट ओढायचा पाईप आणि शस्त्र असे एकत्र असलेले काही बाहेर काढले. आम्ही काही वेळा तो मागेपुढे केला.

जेव्हा आमचे धूम्रपान संपले, तेव्हा त्याने त्याचे कपाळ माझ्या कपाळावर दाबले.

माझ्या कंबरेभोवती हात टाकला आणि म्हणाला, आपले लग्न झाले.”
--- त्याच्या देशाच्या भाषेत त्याचा अर्थ होता, आपण आता पक्के मित्र झालो. गरज पडली, तर तो माझ्यासाठी जीव द्यायलाही मागेपुढे पहाणार नाही. इथे अमेरिकेत अर्थात, आम्ही लोकांवर पटकन विश्वास ठेवत नाही. जवळची, निखळ मैत्री झटपट होत नाही. तरी मला असे वाटते, या निरागस व भयानकपणे आक्रमक माणसाच्या बाबतीत जुने नियम लागू पडणार नाहीत.

रात्रीच्या जेवणानंतर व धूम्रपानानंतर आम्ही आमच्या खोलीत आलो. त्याने मला त्याच्याकडील अमूल्य मुंडके बहाल केले. मग त्याने त्याची तंबाखूची पुरचुंडी काढली व त्याखाली चाचपडून, चांदीचे तीस डॉलर्स काढले. ते त्याने दोन ठिकाणी विभागले. आणि आग्रह करू लागला, की त्यापैकी एक वाटा माझा आहे. मी नकार द्यायचा प्रयत्न केला, पण त्याने ते उचलून, माझ्या खिशात कोंबले. मग त्याने लहानशी पाठीला कुबड आलेली, त्याने आदल्या रात्री काही विधी करण्यासाठी वापरलेली मूर्ती बाहेर काढली व मला त्याच्या पूजेत सामील होण्यासाठी खाणाखुणा केल्या. यामुळे माझ्यापुढे समस्या उभी राहिली. चांगला ख्रिश्चन असल्याने, मूर्तीपूजा माझ्या धर्माविरुद्ध असल्याचे

मला माहिती होते. पण मग मी विचार केला --- कुठलाही स्वर्ग व पृथ्वीवर राज्य करणारा थोर देव कुठल्या लहानशा लाकडी तुकड्याचा द्वेष कसा करेल? आणि आपण आपल्या मित्रमंडळींकडून ज्याची अपेक्षा करतो, तसेच ते देखील आपल्याकडून करत असणार आणि देवालाही तसेच हवे असणार. त्यामुळे मी आग पेटवली व त्या मूर्तीला काही खरपूस बिस्किटे अर्पण केली आणि त्या पुढे नतमस्तक झालो. एवढे करून, मी झोपायला गेलो.

सकाळी लवकर आम्ही दोघेही टक्क जागे झालो. क्विक्वेग त्याच्या गतायुष्याबद्दल बोलू लागला. “मी दक्षिण प्रशांत महासागरातील एका लहानशा बेटावर, कोकोव्होको इथे जन्मलो.” क्विक्वेगचे वडील त्या बेटाचे राजे होते व काका धर्मगुरू होते. वडील वयस्क होऊन वारल्यावर, तो राजा होणार होता. पण ख्रिश्चन जग पाहीलेला क्विक्वेग पहीलाच होता आणि त्याने तेथील लोकांमध्ये खूप सुधारणा केल्या.

त्यामुळे व्हेल पकडणारी बोट जेव्हा कोकोव्होकोला आली, तेव्हा क्विक्वेगने कप्तानाला त्याला सफरीवर घेऊन जाण्यासाठी विनंती केली. कप्तान नाही म्हणाला. पण क्विक्वेगने ते लावून धरले. त्याने त्याची लहानशी होडी वल्हवत, जिथून व्हेल पकडणारी बोट अरुंद मार्गाने जाणार होती, तिथे आणली व त्या बोटीवर चढला. त्याने त्या बोटीच्या डेकवर स्वतःला झोकून दिले. परत कप्तान नको म्हणाला. पण जेव्हा त्याने बोटप्रमुखाचा मुलगा मरायला तयार झालेला पाहीला, तेव्हा त्याने क्विक्वेगला बोटीवर राहून दिले. त्यामुळे क्विक्वेग व्हेलची शिकार करायला शिकला.”

मी विचारले, "आता परत जाऊन स्वतःला राजा म्हणून सूत्रे हातात घेण्याचा तुझा विचार आहे का?"

क्विक्वेगने खलाशांच्या वागणुकीचे निरीक्षण केले. आणि त्याला समजले, की ख्रिश्चनही दुष्ट असू शकतात. मग त्याने ठरवले, की तो तीस राजांपुढे खऱ्याखुऱ्या राजासारखा वागू शकणार नाही. जेव्हा त्याला बोट सोडाविशी वाटेल, तेव्हा नक्कीच नाही."

मी विचारले, "मग आता तू काय करणार?"

तो ठामपणे बोलला, "क्विक्वेग बोटीवरच सफर करणार."

मी म्हणालो, "या नान्टुकेटहून सुटणाऱ्या व्हेलना पकडणाऱ्या बोटीवर काम करायचा विचार मीदेखील करतो आहे."

महाकाय क्विक्वेग मित्राबरोबर गेला आणि त्याच बोटीवर चढायची सही करून आला. मला दोन कारणांमुळे आनंद झाला. क्विक्वेग माझा मित्र होता आणि तो अनुभवी हार्पूनर म्हणजे दोरी बांधलेली, हाताने फेकून मारायची किंवा बंदुकीतून व्हेलमध्ये खुपसायची गंजकी, टोकेरी हत्यारे बाळगून व्हेलला मारणारा होता. माझ्या पहिल्या व्हेल पकडायच्या बोटीवर माझ्यासाठी तो उत्तम शिक्षक होता.

# प्रकरण ३

## अहाब, गूढ कप्तान



Describing the Whale

दुसऱ्या दिवशी सकाळी मी आणि क्विक्वेगने एक चाकाची गाडी आणली आणि आमचे सामान धक्क्यावर आणले. तो म्हणाला, त्याने आयुष्यात पहिल्यांदाच चाकाची गाडी पाहीली आणि तिचे काय करायचे,

हेदेखील त्याला माहिती नव्हते. त्यामुळे त्याने त्याची समुद्रसामानाची बॅग त्यावर घालून ती गाडी पाठीवर घेतली.

मी विचारले, “लोक तुला हसले नाहीत का?”

तो उत्तरला, “लोक निरनिराळ्या प्रकारे हसले. मी तुला अजून एक गोष्ट सांगतो. “बोटीच्या कप्तानाने कोकोव्होकोला भेट दिली, तेव्हाची गोष्ट --- तो क्विक्वेगच्या बहिणीच्या लग्नाला आला होता. धर्मगुरू असलेल्या क्विक्वेगच्या काकाने एका मोठ्या वाडग्यात नारळाचे पाणी घेतले आणि पाहुण्यांना ते देण्यापूर्वी त्यात बोटे घालून, ते पवित्र पाणी म्हणून लोकांच्या अंगावर शिंपडले. कप्तान उत्तम, शहाणा माणूस नव्हता. त्याने त्या पाण्याने हात धुतले --- आता याला तुम्ही काय म्हणाल? त्याला लोक हसणार नाहीत का?”

मी म्हणालो, “हो क्विक्वेग, ते हसणार.”

आतापर्यंत आम्ही न्यू बेडफोर्ड ते नान्टुकेट असा प्रवास करणाऱ्या, मॉस नावाच्या लहान जहाजापर्यंत येऊन पोचलो होतो. आम्ही जहाजाच्या कडेला गेलो. काही प्रवाश्यांनी क्विक्वेगची टर उडवायला सुरवात केली. त्यांच्यापैकी एकाने त्याला फारच राग आणला. त्याचे हार्पून टाकून क्विक्वेगने त्या उद्धट माणसाला उचलले व हवेत उडवले. तो खाली येऊ लागल्यावर, क्विक्वेगने हळूच स्वतःची पाठ त्याच्या कोलांटी उडीच्या मध्ये आणली आणि तो मनुष्य त्याच्या पायांवर उभा राहिला. मग क्विक्वेगने त्याच्याकडे पाठ वळवली आणि सिगरेट ओढायचा पाईप पेटवला.

त्या माणसाने कप्तानाकडे तक्रार केली. कप्तान धावत आला व ओरडला, “तू त्या माणसाला मारले असतेस, तू त्याला काय करत होतास?”

क्विक्वेगने शांतपणे विचारले, “तो काय म्हणाला?”

मी त्या थरथरणाऱ्या माणसाकडे निर्देश करत बोललो, कप्तान म्हणाला, की तू त्या माणसाला जवळजवळ ठार मारले होतेस.

क्विक्वेगने त्याच्याकडे एक क्षुद्र कटाक्ष टाकला.

“जवळजवळ ठार मारले? तो छोटा मासा. क्विक्वेग छोट्या माशाला मारत नाही, तर मोठ्या व्हेलला मारतो!”

कप्तान किंचाळला, “अरे नरभक्षका, जर तू अजून काही खोडी काढलीस, तर मी तुला ठार करेन, लक्षात ठेव.”

पण ती कप्तानाचीच लक्षात घ्यायची वेळ ठरली. मुख्य शीड उभारण्यात काहीतरी चुकले. जहाज नीट ताणलेले ठेवणारा खालील लांब खांब डेकवर इकडून तिकडे मोठे झोके घेत, जोरात हलू लागला. एका झोक्याने त्या उध्दट माणसाला उडवले व मग त्याला मागेपुढे झुलवू लागला. तो खांब मोडेपर्यंत असे चालणार, असे दिसू लागले. डेकवर क्विक्वेग सोडून सगळे काय करावे, हे न कळून गोठून गेले. पहिल्यांदा त्याने त्याचे गुडघे वाकवले व जोराने हलून आवाज करणाऱ्या दोराच्या खाली रांगत गेला. त्याचे एक टोक त्याने संरक्षक भिंतीला किंवा वरील डेकच्या कडेला बांधले. हुक असलेले दुसरे टोक त्याने त्याच्या डोक्यावरून नेताना त्याचा आवाज होऊन, ते हेलकावे घेऊ लागले. परिसर स्तब्ध होता.

मग त्याने शर्ट काढून टाकला आणि गोठवणाऱ्या फेसाळ पाण्यात सूर मारला. क्विक्वेग सोडून आणखी कुणी आजूबाजूला पोहतांना दिसत नव्हते. अचानक पाण्याखाली जाऊन, तो दिसेनासा झाला व नंतर एका हाताने पाणी कापत वर आला.

दुसऱ्या हाताने त्याने काही ओढत आणले. तो उद्धट मनुष्य वाचला. कप्तानाने क्विक्वेगची क्षमा मागितली आणि मी निश्चय केला की कधीही माझ्या या उत्तम मित्राची बाजू सोडायची नाही. काही काळाकरता मला त्याच्यापासून दूर व्हावे लागले. पण एकदा मॉस नान्टुकेटला पोचल्यावर, आम्ही न्यू बेडफोर्ड मधील आमच्या खोलीत परत आलो.

क्विक्वेगने आग्रह धरला, की योजो नावाच्या त्याच्याकडे असलेल्या लहानशा मूर्तीने त्याला काही संदेश दिला आहे. तो असा होता, की मी एकट्यानेच व्हेल पकडणाऱ्या बोटीवर चढावे. ती छोटीशी, जुन्या पद्धतीची पिक्वॉड बोट तीन वर्षांकरता व्हेल पकडायच्या मोहिमेवर निघणार असल्याची खात्री करून, मी ती निवडली. एका सूर्याच्या उन्हाने भाजलेल्या व सुरकुत्या पडलेल्या सभ्य माणसाला मी बोटीच्या कडेला भेटलो व त्याला म्हणालो, की मला या बोटीवर यायचे आहे. त्याने मला कप्तान पेलेग अशी त्याची ओळख करून दिली. तो पिक्वॉडच्या दोन मालकांपैकी एक होता.

कप्तान पेलेगने विचारले “मी तुला इथे घ्यायचे की नाही हे ठरवण्यापूर्वीच, तू व्हेल पकडायच्या बोटीवर यायचे कसे काय ठरवलेस?”

“सर, त्याचे काय झाले, मला व्हेल कसे पकडतात, ते बघायचे होते.”

“तू कधी कप्तान अहाबला भेटलास का?”

“सर, कप्तान अहाब कोण आहे?”

तो या बोटीचा कप्तान आहे. तू या व्हेलिंगच्या भानगडीत शिरण्यापूर्वी, एकदा त्याची गाठभेट का घेत नाहीस? तू त्याला एक पायाचा मनुष्य म्हणून ओळखशील.”

“त्याने व्हेलची शिकार करतांना एक पाय गमावला का?”

“तू असे विचारलेस. अरे तरुण माणसा, त्या भल्या मोठ्या सागरी राक्षसाने तो तोडून त्याचे तुकडे केले!”

परंतु त्या वयस्क कप्तानाची गोष्ट ऐकून माझा निश्चय काही बदलला नाही आणि ते मी त्याला पटवू शकलो. मी बोटीवर चढायचे ठरवलेच होते. जेव्हा मी त्याला क्विक्वेगबद्दल सांगितले, तेव्हा मी अगदी निघतांना, मला आठवले, की बोटीच्या कप्तानाला भेटलोच नाही.

मी विचारले, “कप्तान अहाब मला कुठे भेटेल?”

“तुला त्याला कशाला भेटायचे आहे? तू बोटीवर आलास, बास झाले.”

“पण तरीही मला त्याला भेटायला आवडेल.”

कप्तान पेलेग बोलला, “ठीक आहे, पण मी नक्की सांगू शकत नाही. तो आजारी आहे --- नाही, तो तसा आजारी नाही. पण फार बराही नाही. तसेही, तो मला फारसा भेटत नाही. त्यामुळे तो तुला भेटेल, की नाही याची मला शंकाच

आहे. तो जरा मनस्वी आहे, पण चांगला मनुष्य आहे --- तुला माहिती आहे का, की बायबल मधील एका राजावरून त्याचे नाव ठेवले आहे.”

मी विचारले, “पण बायबलमधील अहाब राजा दुष्ट असतो व व तो मारला जातो, बरोबर ना?”

“पिक्वॉड बोटीवर असे कधीही बोलू नकोस. अहाबने काही त्याचे नाव निवडले नाही. मला तो माहिती आहे. त्याच्या मागील मोहिमेनंतर घरी त्याची मनस्थिती थोडी बिघडली होती, पण ते त्याच्या पायाला वेदना होत असल्याने, झाले असावे. आणि लक्षात ठेव, त्याला तरुण बायको व मुलगा आहे. त्याचा नावाच्या दुष्टपणाच्या इतिहासावरून, त्याला आजमावू नकोस.”

चमत्कारिक कप्तान अहाबबद्दल कप्तान पेलेगने सांगितलेले मनात आठवून, मी कोड्यात पडलो होतो.


# प्रकरण ४

## शीड उभारतांना

जसे आम्ही वर चढलो, तसे कप्तान पेलेगने आम्हाला थांबवले. धक्का बसत, तो बोलला, “तू मला हे सांगितले नाहीस, की क्विक्वेग नरभक्षक आहे. आम्ही कुणाही पागनला त्यांनी त्यांचा धर्म बदलल्याशिवाय बोटीवर घेत नाही. क्विक्वेग ख्रिश्चन असल्याचे कागदपत्र तुझ्याकडे आहेत का?”

मी म्हणालो, “पहील्या रोमन कॅथॉलीक चर्चचा तो सभासद होता.”

म्हणजे डीकॉन कोलमनने पुढाकार घेतलेल्या? मी तिथे दर रविवारी जातो, पण मी त्याला तिथे एकदाही पाहिलेले नाही. तू मला थाप मारतो आहेस का?”



The Three Harpooners

मी बोललो, “ऐक, तो जन्मापासून सभासद आहे आणि स्वतःच डीकॉन [चर्चमधील धर्मगुरुच्या हाताखालील पद सांभाळणारा] आहे.

कप्तान म्हणाला, “अरे काय सांगतोस, कुठल्या चर्चबद्दल तू बोलतो आहेस?

मला अपमान केल्यासारखे वाटून, मी म्हणालो, “जगातील पहील्या रोमन कॅथॉलीक चर्चचा तो सभासद होता. तू, मी आणि प्रत्येक आईचा सुपुत्र त्या चर्चमध्ये प्रार्थना करतो. ते आपणा सर्वांचे चर्च आहे. आपणात बारीकसारीक मतभेद असतील, पण एका परम देवावर आपला सगळयांचा विश्वास आहे. पेलेग बोलला, ”मी यापूर्वी कधी याहून चांगले धार्मिक प्रवचन ऐकले नाही. कदाचित मिशनरी म्हणून तू जहाजावर काम करणे आवश्यक आहे. पण मला असे सांग, तुझा मित्र क्विक्वेग याने कधी व्हेलच्या शिकारीत भाग घेतला आहे का?

क्विक्वेगला तो प्रश्न समजला तो त्याने आव्हान म्हणून स्वीकारला. त्याने संरक्षक भिंतीवरुन एका लटकणाऱ्या बोटीच्या पुढील भागावर उडी मारली. त्याचे हार्पून उंचावून, त्याने पुकारले, “कप्तान, तुम्हाला पाण्याच्या पृष्ठभागावर तिकडे पाण्याचे चिकट झालेले लहान कडक थेंब दिसत आहेत का? मला वाटते, तो एका व्हेलचा डोळा असावा. मग छानच आहे!

मग नीट पवित्रा घेऊन, क्विक्वेगने त्या चकाकीत कडक थेंबावर नेम साधला.

तो रोखठोकपणे त्या व्हेलला खेचत बोलला, “त्या व्हेलच्या डोळ्यावरून, तो मेलेला वाटतो आहे.”

पेलेगने झटपट त्याला बोटीवर घ्यायचे ठरवले. स्वतःचे नाव लिहिण्याऐवजी क्विक्वेगने त्याच्या दंडावरील टॅटूची खूण तिथे उमटवली. आम्ही पिक्वॉड बोटीवरून खाली उतरलो व रस्त्याने रमतगमत चालू लागलो. तेव्हा आम्हाला एका गबाळ्या कपड्यातील परक्या इसमाने थांबवले. त्याचा खराब चेहरा पुटकुळ्यांनी भरलेला होता. त्याने पिक्वॉड बोटीकडे संगिनीसारखा निर्देश करत विचारले,

“अरे जहाजावरील सहप्रवाश्या, तुला जहाजावर चढायची परवानगी मिळाली आहे का?

मी म्हणालो, “हो, आताच आम्ही कागदांवर सह्या केल्या.”

“त्या कागदांमध्ये तुमच्या आत्म्याबद्दल काही होते का?”

मी नवल वाटून विचारले, “आमच्या कशाबद्दल?”

तो परका इसम बोलला, “ठीक आहे, तुमच्या कागदांमध्ये त्याबद्दल काही नसेल. पण इतर लोकांच्यासाठी त्यांनी ते भरून काढले असेल --- नक्कीच --- जुने वादळ”

“जुने वादळ, हे कोण आहे?”

“अर्थात कप्तान अहाब. तुम्हाला त्याच्याबद्दल काय माहिती आहे?”

जरी त्या परक्या इसमाचे मन थोडे घसरलेले वाटले, तरी मी त्याला उत्तर दिले, “त्याला व्हेल कसा पकडायचा ते माहिती आहे व तो चांगला कप्तान आहे.”

“दोन्ही खरे आहे --- पण इतर गोष्टींचे काय? ओहो, ठीक आहे. काळजी करू नका तुमची नावे आधीच बोटीवर चढायच्या लोकांच्या यादीत आहेत. मला वाटते, काही खलाशांना त्याच्या बरोबर जावे लागेल. देव त्यांच्यावर दया करो. शुभ सकाळ आणि देव त्यांना आशीर्वाद देवो.”

मी म्हणालो, “तू आम्हाला फसवू शकत नाहीस. तुझ्याकडे काही गुपित आहे, असे भासवणे सोपे आहे.”

तो जायला निघतांना म्हणाला, “तुला शुभ सकाळ.”

मी बोललो, “चल, क्विक्वेग या विचित्र माणसाला सोडून देऊ. पण तुझे नाव आम्हाला सांग, सांगशील का?”

तो उत्तरला, “इलीझा”

क्विक्वेग व मी अशा विचारावर सहमती दर्शवत निघून गेलो, की तो चिंध्या पांघरलेला म्हातारा परका इसम थापाड्या होता. पण इलीझा या नावाने मला विचार करायला भाग पाडले. इलीझा हा बायबलमधील भविष्यातील वाईट गोष्टी दर्शवणारा प्रेषित होता.

तीन वर्षांच्या सफरीकरता लागणारे सर्व सामान पिक्वॉड बोटीवर लादले जाईपर्यंत, काही दिवस आम्ही थांबलो. मी कप्तान अहाबला भेटायचा प्रयत्न

करत राहिलो व मला नेहमी तेच उत्तर मिळाले, की --- त्याची तब्येत सुधारते आहे आणि लवकरच तो बोर्डावर येईल. जेव्हा आम्हाला असे कळले, की बोटीचे शीड उभारायचे काम आमचे आहे, तेव्हाही तो आम्हाला भेटला नव्हता. कप्तान न भेटलेल्या बोटीवर तीन वर्षे काढायची, याबद्दल मला अस्वस्थ वाटू लागले.

मी आणि क्विक्वेग धक्क्यावर पोचलो, तेव्हा साधारण पहाटेचे सहा वाजले असतील. मी आमच्यासमोर काही खलाशी इकडून तिकडे धावताना पाहिले, असे मला वाटले, पण सकाळच्या धुक्यात मला काही खात्री नव्हती.

एक आवाज आला, "थांबा." आणि आमच्या दोघांच्या खांद्यावर एक हात पडला. तो इलीझा होता.

त्याने विचारले, "तुम्ही परदेशी जात नाही आहात का?"

मी उत्तरलो, "जात आहोत, पण त्याच्याशी तुला काय करायचे आहे?"

त्याने विचारले, "आता तुम्ही काही माणसे जहाजावर जातांना पाहिली का?"

मी बोललो, "पण ते कोण होते हे दिसण्यासाठी फारच कमी प्रकाश होता."

"फार कमी, फारच कमी. बघा आता तुम्हाला ते कुठे सापडतात का --- सकाळच्या प्रकाशात तुम्ही बघू शकाल. मला वाटते, तुम्ही पुन्हा नीट बघावे." असे शब्द चाचरत बोलून तो गेला.

पिक्वॉडने नांगर टाकला व कप्तान पेलांगच्या नेतृत्वाखाली आम्ही शीड उभारले. आम्ही खाडीच्या व समुद्राच्या बाहेर होतो, तेव्हा एका लहान शिडाची बोट त्याला परत काठावर सोडण्यासाठी आली. मी व क्विक्वेगने अजून कप्तान अहाब पाहिला नव्हता, पण ताफ्यातील इतरजणांशी आमची ओळख झाली.

मुख्य ऑफिसर स्टारबक हा बारीक पण भक्कम माणूस होता. तो मला व्यावहारिक दृष्ट्या शूर वाटला. त्याचे वडील व भाऊ समुद्रावर हरवल्यावर, तो भलताच मूर्खासारखा धोका घ्यायला तयार नसे.

स्टब हा दुसरा ऑफिसर भित्रा नसलेला, थंड व सहनशील होता. तो सतत सिगरेट ओढे. त्याला त्याच्या लहानशा, काळ्या पाइपशिवाय बघणे म्हणजे नाकाशिवाय त्याचा चेहरा बघण्यासारखे होते.

फ्लास्क हा तिसरा ऑफिसर बुटका आणि जाड होता. तो व्हेलच्या शिकारीवर केवळ गंमत म्हणून आलेला होता. केप हॉर्न या अमेरिकेच्या दक्षिण टोकाभोवतीचा हा लांब प्रवास म्हणजे त्याच्यासाठी फक्त एक आनंदी विनोद होता.

या तीन ऑफिसर्सपैकी प्रत्येकजण पिक्वॉडच्या व्हेल पकडणाऱ्या लहान बोटीला आज्ञा देत असे व प्रत्येकाकडे स्वतःचा हार्पूनर होता. मुख्य ऑफिसर स्टारबकने क्विक्वेगला निवडले होते. टॅष्टेगो हा मॅसॅच्युसेट इंडीयन दुसऱा ऑफिसर असलेल्या स्टबबरोबर काम करे आणि डॅगो हा महाकाय आफ्रिकन फ्लास्कचा हार्पूनर होता.

हे तीन ऑफिसर्स आळीपाळीने आज्ञा देत असत. यात कुठे अहाबचा सहभाग दिसत नव्हता. नंतर काही दिवसांनी आम्ही नान्टुकेट सोडले. मला बोलावणे आल्याने मी दुपारी डेकवर आलो. अचानक अंगावर काटा येऊन, मी त्याला --- पाहिले.


कप्तान अहाब! त्याला बघून मला उंचनिंच ब्रॉन्झच्या पुतळयाची आठवण झाली. तो तिथे खूप गंभीरपणे उभा होता. त्याच्या करड्या केसांना लागून एक पांढरा ओरखडा चेहऱ्यापासून सुरु होऊन, मानेतून त्याच्या कपड्यात गुप्त झाला होता. तो विजेच्या धक्क्याने पडलेल्या मोठ्या झाडातील एखाद्या रेषे सारखा दिसत होता. पण अजून जिवंत होता --- आणि विशिष्ट नाव असलेला होता. त्याचा एक पाय हस्तिदंती रंगाचा व व्हेलच्या जबड्यातील गुळगुळीत हाडापासून बनवलेला होता.

सतत डुचमळणाऱ्या जहाजात तो त्या हस्तिदंती रंगाच्या पायाने कसा काय ताठ उभा राहू शके, याचे मला नवल वाटे. मग मला त्याचे स्पष्टीकरण मिळाले. ऑफीसर्सच्या डेकला प्रत्येक बाजूला अर्ध्या इंचाचे भोक पाडलेले होते. त्याचा कृत्रिम पाय त्यात बरोबर बसत असे. त्यामुळे तो ताठ उभा राहू शके व जहाजाच्या पुढील निमुळत्या भागात त्याचा विशिष्ट पट्टीतील आवाज नेहमी येत असे.

कप्तान अहाब कुठल्यातरी मोठ्या दुःखाने गांजलेला दिसे.

# प्रकरण ५

# मॉबी डिक मरो




जसे आमचे जहाज दक्षिणेकडे जाऊ लागले, तशी हवा तप्त होऊ लागली. कप्तान अहाब त्याचा पाय भोकात घालून उभे रहाण्यासाठी किंवा तिथे ठेवलेल्या स्टुलावर बसण्यासाठी, सतत डेकवर येऊ लागला. तो डेकवर डुगडुगत चालत असे. रात्री तो त्याच्या लाकडी पायाने डेकवर अस्वस्थपणे चालतांना आवाज झाल्याने आम्ही जागे रहात असू. जेव्हा स्टबने अर्धवट विनोदाने त्याला विचारले, की पुढील रात्री तो डेकवर चालेल, तेव्हा त्याने त्याचा लाकडी पाय गुंडाळून घ्यावा तेव्हा अहाब त्याच्यावर ओरडला, “कुत्र्या,

चूप बस आणि तुझ्या खुराड्यात जा!" क्षणभर स्टबची बोलती बंद झाली. मग तो बोलला, "सर, मला कुणाचे असे बोलणे ऐकून घ्यायची सवय नाही. मला हे आवडले नाही."

"मग मी तुला दहा वेळा गाढव म्हणतो आणि चालता हो, नाहीतर मी तुला जगातून नाहीसा करेन." अशी धमकी देत अहाब त्याच्या अंगावर चालून जाऊ लागला.

`स्टबने माघार घेतली. जाता जाता तो लोकांना बोलला, "मला कळत नाही आहे, की त्याला धडक द्यावी की त्याच्या साठी प्रार्थना करावी. तो वेडा आहे का? आणि त्याच्या मनात असे काय चालले आहे, की ज्यामुळे तो दिवसातले फक्त तीन तास अंथरुणात घालवतो? आणि तेव्हासुद्धा झोपत नाही. त्याचे अंथरूण नेहमी विस्कटलेले असते आणि उशी भाजलेल्या विटेसारखी गरम असते. तो सतत कोड्यात पडलेला असतो."

एका सकाळी न्याहारीनंतर, नेहमीप्रमाणे अहाबचा पदरव आला. डेकवर त्याच्या लाकडी पायाने भोकात घातलेला भाग नेहमीपेक्षा जास्त रुतलेला वाटत होता. तो उदास असल्यामुळे, असे झाले असावे. त्याच्या कपाळावरही आठ्या होत्या, जसे काही एक विचार त्याला सतत जागे ठेवत होता.

दिवसभर तो डेकवर फिरत होता. अचानक, दिवस संपताना तो संरक्षक भिंतीशी थांबला व स्टारबकला सांगितले, की सगळ्यांना इथून जायला सांग.

अशी विचित्र आज्ञा ऐकून, स्टारबक आश्चर्यचकीत झाला. सगळ्या ताफ्याला जहाजाच्या मागील बाजूला गोळा होण्याची ती आज्ञा होती.

आमची चौकस कुजबुज न ऐकता, कप्तान अहाब डेकवर फिरत होता. शेवटी, तो ओरडला, "अरे लोकांनो व्हेल पाहिल्यावर तुम्ही काय कराल?

उत्तर आले, "त्याच्यासाठी गाऊ."

"छान! आणि नंतर काय कराल?

"खाली उतरून त्याच्या मागे जाऊ."

"आणि कुठली सुरावट गात बोट वल्हवाल?"

"मेलेला व्हेल किंवा स्टोव्ह बोट!"

प्रत्येक उत्तराबरोबर अहाबचा चेहरा आनंदी दिसू लागला. मग त्याने एक चकचकीत नाणे काढले व हातोडा मागवला.

"इकडे बघा. तुम्हाला हे एक औसाचे सोन्याचे स्पॅनिश नाणे दिसते आहे? तुमच्यापैकी ज्या कुणाला पांढऱ्या डोक्याचा, सुरकुतलेल्या भुवयांचा व वाकड्या जबड्याचा व्हेल दिसेल; तुमच्यापैकी ज्या कुणाला पांढऱ्या डोक्याचा व उजवीकडे तीन भोके पडलेला, असा कधी न दिसणाऱा --- पहा, पहा, तुमच्यापैकी ज्या कुणाला तो पांढरा व्हेल दिसेल, त्याला हे सोन्याचे नाणे मिळेल!"

अहाबने शिडावर ते नाणे ठोकले, त्यासरशी "हुर्ये हुर्ये " असा आरडाओरडा खलाशी करू लागले.

अहाबने चालू ठेवले, “मी म्हणतो, तो पांढरा व्हेल आहे. पांढऱ्या पाण्यात निरखून बघा. जर तुम्हाला बुडबुडा दिसला तर गाणे गा.”

हा सर्व वेळ इतर ताफ्यापेक्षा टॅष्टेगो, डॅगो व क्विक्वेग अधिक रस घेऊन व अधिक नवलपूर्णतेने तो व्हेल दिसतो का, ते बघू लागले. सुरकुतलेल्या भुवयांचा व वाकड्या जबड्याचा असा उल्लेख ऐकून, ते पूर्वीच्या काही स्मरणरंजनात हरवून गेले.

टॅष्टेगो बोलला, “कप्तान अहाब, तो पांढरा व्हेल म्हणजे मॉबी डिक नावाचा व्हेल असावा.”

“अरेच्या! टॅश, म्हणजे तुला पांढरा व्हेल माहिती आहे?”

डॅगोने विचारले, “कप्तान अहाब, खोल पाण्यात जाण्यापूर्वी, तो त्याची शेपटी आजूबाजूला हलवतो का? त्याला विचित्र कल्ले असून, तो फार चपळ आहे का?”

क्विक्वेग ओरडला, “कप्तान, त्याने त्याच्या अंगात दोन तीन लोखंडी [वावटळींसारखे काही] लपवलेले आहेत का?” क्विक्वेगने त्याचे हात गोलगोल फिरवून दाखवले. “असे --- “

अहाब किंचाळला, “बूच उघडायचा धातूचा दांडा! अरे क्विक्वेग, वेडेवाकडे झालेले हार्पून त्याच्या शरीरात इकडेतिकडे घुसलेले आहेत. अरे डॅगो, त्याचा कल्ला भला मोठा आहे. अरे टॅष्टेगो, आणि तो खोल पाण्यात जाण्यापूर्वी, त्याची शेपटी आजूबाजूला हलवतो. मृत्यू आणि राक्षस! लोकहो, तुम्ही पाहिलेला तो मॉबी डिक आहे. मॉबी डिक, मॉबी डिक!”

स्टारबक बोलला, “कप्तान अहाब, तुमचा पाय तोडणारा, तोच हा मॉबी डिक का?

“हो, त्या शापित पांढऱ्या व्हेलने मी ज्यावर आता उभा आहे, ती मृत काठी मला दिली. मी त्याला केप ऑफ गुड होपभोवती व केप हॉर्नभोवती आणि नरकाच्या आगीभोवती नक्कीच शोधून काढेन. आणि लोकहो, यासाठी, त्या पांढऱ्या व्हेलला पाठलाग करून पृथ्वीच्या कुठल्याही बाजूकडून शोधून काढण्यासाठी व त्याला काळे रक्त ओकून तडफडवण्यासाठी, तुम्ही या जहाजावर आहात. तर मग लोकहो, तुम्ही यावर काय म्हणता? यात सहभाग घेण्यासाठी, तुम्ही पुरेसे शूर आहात का?”

खलाशी आणि हार्पूनर्स ओरडले, ”हो, हो!”

अर्धवट ओरडत, अर्धवट गहीवरत, अहाब बोलला, “शाबास लोकहो, देव तुम्हाला बळ देवो. अरे नोकरा, या लोकांसाठी रम आण. मग स्टारबकला गप्प उभे राहिलेले बघून, अहाबने विचारले, “स्टारबक, तू इतका उदास का दिसतो आहेस? तू मॉबी डिकचा पाठलाग करणार नाहीस का?

स्टारबकने एकट्याने कप्तानाला विरोध केला. पण अर्थात तो कप्तानाविरुध्द बंड करणार नव्हता.

“देवा मला वाचव! देवा सर्वांना वाचव!” तो हळूवारपणे पुटपुटला.

“या वाकड्या मरणाच्या जबड्यासाठी मी एक व्हेलिंगचा व्यावसायिक शिकारीचा खेळ खेळायला आलो आहे. पण माझ्या कप्तानाच्या सूड उगवण्यासाठी मला ते करायचे नाही!”

अहाबने मिश्रधातुचे मोठे भांडे भरून रम मागवली. जवळच्या खलाशाला ती देत, तो ओरडला, “प्या आणि पुढे पाठवा! सावकाश प्या. सैतानाच्या लाथेइतके ते जहाल आहे --- छान, जवळजवळ संपलेच. अरे नोकरा, ते परत भर.”

नंतर त्याने तिन्ही ऑफीसर्सना पुढे बोलावले. तिन्ही भाल्यांची एकत्र फुली करून, त्याच्या एकत्र बिंदुला धरत, तो बोलला, “भाले फुली करून ठेवायची कोळी लोकांच्या बापांची मोठी रीत आहे, तर तसे तुम्ही करा. स्वतःसारखी उत्साहाची आग त्यांच्यात पेटवण्यासाठी, त्याने स्टारबकपासून स्टबकडे व स्टबकडून फ्लास्ककडे बारकाईने बघितले. त्याची बळकट, गूढ, एकटक नजर टाळून, ते दुसरीकडे बघू लागले.

अहाबने आज्ञा दिली, “भाले खाली करा.” मग तो क्विक्वेग, टॅष्टेगो व डॅगोकडे वळून बोलला, “आणि आता, माझ्या तीन शूर व निश्चयी हार्पूनर्स मित्रांनो, तुमच्या शस्त्रांपासून धारदार लोखंडी टोके वेगळी काढा.”

क्विक्वेग, टॅष्टेगो व डॅगो यांनी त्यांच्या हार्पून्सपासून धारदार लोखंडी टोके वेगळी काढली व ती उलटी केली, जेणेकरून त्यांचा पोकळ उघडा भाग वर झाला. त्यात रमचे पेले ठेऊन, अहाबने फर्मान सोडले, “प्या आणि शपथ घ्या --- मॉबी डिक मरो!”

## प्रकरण सहा

## वेताळ पाच

मी सगळ्या प्रकारची व्हेलसंबंधीची व विशेष करून मॉबी डिकसंबंधीची माहिती गोळा करायला सुरवात केली. सर्वात किंमती व्हेल म्हणजे स्पर्म व्हेल होय.

कारण त्याचा स्पर्मासेटी --- त्याच्या डोक्यातून तेलातून काढलेला पांढरा मेणासारखा पदार्थ, जगातील दिवे पेटवतो आणि सुगंधी तेले बनवण्यातील तो मुख्य घटक असतो.



Moby Dick Had Cut Off Ahab's Leg.

मॉबी डीकसंबंधी मी असे वाचले, की तो स्पर्म व्हेल्स पासून वेगळा असल्याने, खूप लांब अंतरावरून ओळखता येतो. त्याला फक्त आठ्या असलेले पांढरे शुभ्र कपाळ व पांढरा उंचवटा असतो असे नाही, तर त्याचे महाकाय शरीर त्याच पांढऱ्या रंगाच्या डागांनी भरलेले असते व त्यामुळेच त्याला पांढरा व्हेल असे नाव पडले आहे."

तो भीतीमुळे जहाजापासून त्याच्या मागावर सोडलेल्या बोटीपासून वेड्यासारखा लांब पोहत असतो. पण ते घाबरण्याचे फक्त नाटक असते. तो इकडेतिकडे वळून त्याचा पाठलाग करणाऱ्या बोटीवर हल्ला करून, ती मोडू शकतो किंवा त्यांना जहाजात पळवून लाऊ शकतो.

एकदा कप्तान तीन बोटी घेऊन, मॉबी डिकवर चालून गेला. त्या व्हेलने तिन्ही बोटी मोडून टाकल्या. त्याची माणसे समुद्रातील भोवऱ्यांमध्ये अडकलेली पाहून कप्तानाने सहा इंची पाते असलेला लहान चाकू काढला आणि द्वन्द्वामधील रानटी माणसासारखा मॉबी डिकच्या हृदयावर हल्ला केला. तो कप्तान अहाब होता. त्याच क्षणी व्हेलने त्याच्या खाली वळलेला जबड्यात अहाबचा पाय धरून तोडला!

त्या क्षणापासून, अहाबला त्या व्हेलचा सूड घ्यायचा होता. तेव्हापासून अहाबसाठी जगातील सर्व दुष्टावा त्या एका प्राण्यामध्ये एकवटला होता. मला नवल वाटले, की अहाबने त्याच्या ताफ्यासाठी ती सूडाची भावना चेतवली होती आणि त्याचा शत्रू तो त्यांचादेखील शत्रू बनला होता.

एका चंद्रप्रकाशाच्या रात्री, पिण्याच्या पाण्याचे पिप भरण्यासाठी आम्ही ओळीत उभे राहून, बादल्या एकमेकांना देत होतो. अचानक एक खलाशी दुसऱ्याला बोलला, “शू --- तुला कसला आवाज आला का?”

“कसला?”

“हा बघ. कवचाखालून यावा तसा! तो कफासारखा आवाज परत येतो आहे.”

“अरे मित्रा, जरा स्तब्ध रहाशील का? संध्याकाळच्या जेवणात तू तीनदा बुडवून खाल्लेले बिस्कीट तुझ्या पोटात फिरते आहे --- बाकी काही नाही. आता मला बादली दे.”

खलाशी म्हणाला, “तू तुला हवे तेवढे तोंडभरून हसत बस. आपण बघू काय होते. डेकवर न दिसलेले असे कोणी खाली आहे. मला वाटते, वयस्क अहाबला त्याबद्दल काही माहिती असावे. एका सकाळी मी स्टबला फ्लास्कला असे सांगतांना ऐकले की वाऱ्यामध्ये काही विशेष आहे.”

काही वेळ या गूढातून काहीच बाहेर आले नाही. नंतर मुख्य शिडावर लक्ष ठेऊन असणारा, टॅष्टेगो गाऊ लागला, ‘ते फडकते आहे.” इंडीयनला कुठे व्हेलचा सुगावा लागला आहे, हे बघण्यासाठी मी वर पाहिले. टॅष्टेगो उंचावरील हवेत उभा होता. लांब, बारीक काठीसारखे त्याचे हात ताणलेले होते.

“तिथे तो तरंगतो आहे! तिथे! तिथे! तिथे!”

फार उत्साहीत आरोळ्या आल्या, “कुठे? कुठे?”

“‘बोटीच्या काटकोनात, सुमारे दोन मैलांवर! त्यांची शाळा आहे.!”

याचा अर्थ ते वाऱ्यापासून लांब, एका बाजूला होते. ताबडतोब सगळे गोंधळून गेले होते.

अहाब ओरडला, ‘झटपट, लोकहो! मला वेळ सांगा. वेळ सांगा!”

कामगार खलाशी घड्याळ बघायला घाईने खाली गेले. त्यांनी अहाबला बरोबर वेळ सांगितली.

आम्हाला माहिती होते, की अहाब काळजीपूर्वक नोंद ठेवत असे, की व्हेल्स कधी आणि कुठे दिसले व पकडले गेले. प्रत्येक रात्री तो त्याच्या खणातून चुरगळलेले मोठे समुद्र तक्ते उलगडून, निरनिराळ्या रेषांचा व कमी जास्त रंगांचा अभ्यास करत असे आणि त्याच्या पेन्सिलने सावकाशीने मार्गक्रमणा कशी करायची, ते दाखवत असे. धगधगत्या उद्दिष्टाकडे जाण्यासाठी, मॉबी डीकला शोधून मारण्यासाठी, तो चारही समुद्रांच्या प्रवाहाचे जोर व व्हेल्सच्या सवयी अभ्यासत असे.

पिक्वॉडचा मुख्य व्यवसाय व्हेल पकडून मारणे हा होता आणि जरी आम्ही तो करत असलो तरी, अहाबचे खरे भक्ष्य काय आहे, हे मला माहिती होते.

आता जहाज वाऱ्यापासून दूर ठेवले जात होते. त्याच्या कडेला तीन लहान बोटी लटकत होत्या. या उत्कंठावर्धक क्षणी आम्हाला अचानक रडणे ऐकू आले.

त्यामुळे सगळयांचे लक्ष व्हेलवरून उडून अहाबकडे गेले. तो कप्तान डेकवर त्याच्याभोवतीच्या पाच गडद वेताळांबरोबर जणू वाऱ्यापासून दूर उभा होता. ते विचित्र लोक शांतपणे एक जास्त असलेली बोट खाली करत होते.

अहाबने विचारले, “फेडल्लाह, सर्व काही तयार आहे?”

स्टीलसारख्या ओठांमधून, वाईट पद्धतीने बाहेर डोकावणाऱ्या एक दात असलेल्या, एका उंच, काळया आकृतीकडून थोडे रागावलेले उत्तर आले, “तयार आहे.” त्या माणसाने जुने, काळे सुती जाकीट व पँट घातली होती आणि त्याचे लांब, पांढरे केस फेट्यासारखे त्याच्या डोक्याभोवती चपखलपणे बसले होते. इतर माणसांचे शर्ट वाघासारख्या पिवळया रंगाचे होते. ते ऑस्ट्रेलीयाजवळील फिलीपाईन बेटावरचे होते.

काही खुळया समजुतींवर विश्वास ठेवणाऱ्या खलाशांचा विश्वास होता, की हे मागासलेले लोक राक्षसाचे गुप्तहेर आहेत.

कप्तान अहाब ओरडला, “आता खाली करा.”

मेंढरांप्रमाणे आमची माणसे जहाजाच्या तिरप्या केलेल्या बाजूने त्या तीन बोटीमध्ये खाली उतरली. तरंगणाऱ्या चौथ्या बोटीत त्या पाच विचित्र लोकांमध्ये अहाब उभा होता. तो पाण्यावरून स्टारबक, स्टब व फ्लास्क यांच्यावर ओरडून सांगत होता, की तुम्ही पसरून, मोठे क्षेत्रफळ व्यापा.

जेव्हा मिनिटाभराकरता, त्यांच्या दोन बोटी जवळ आल्या, तेव्हा स्टारबकने स्टबला हाक मारून विचारले, “तुला त्या पाच पिवळया विचित्र लोकांबद्दल काय वाटते? जहाज सुटण्यापूर्वी त्यांना कसेबसे इथे पैदा केले


असावे. मिस्टर स्टब, ही उदास करणारी भानगड आहे. पण ठीक आहे. लोकहो, जोर लावा. जोरात ओढा!”

“मलादेखील असेच वाटते. त्यामुळे जहाजातून खाली बोटीत उतरायचा त्याचा आग्रह चालला होता. ती माणसे तिथे लपून बसली होती. यामागे तो पांढरा व्हेल आहे. ठीक आहे. ठीक आहे. आता काही इलाज नाही --- लोकहो, सोडून द्या. आज काही पांढरा व्हेल येत नाही!”

मी शांतपणे विचार केल्यावर, नान्टुकेटमधील अंधाऱ्या पहाटे मला पिक्वॉडमध्ये सरपटत चढणाऱ्या काही गूढ आकृत्यांच्या सावल्या दिसल्याचे आठवले. त्या इलीझा नावाच्या विचित्र माणसाने दिलेल्या कोड्यात टाकणाऱ्या सूचनाही मला आठवल्या. मी जेव्हा कमी उत्तेजित झालेला असेन, तेव्हा आठवण्यासारखे खूप काही होते. पण आता प्रत्येकाने व्हेलवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे होते.

# प्रकरण ७

# बोटीतील लोक



The *Pequod* Bears Down on the Men.

अहाबचे पिवळा शर्टवाले लोक व्हेलच्या जबड्यातील विशिष्ट हाडासारखे लवचिक व स्टीलसारखे बळकट दिसत होते. खटक्याने हाणायच्या हातोड्याप्रमाणे असलेले ते पाचजण त्यांच्या नेहमीच्या जोरदार वल्ह्याच्या धक्क्याने वरखाली होत होते. बोटीच्या एका टोकाला असलेला फेडल्लाहने हार्पूनरचे वल्हे खेचले तर दुसऱ्या टोकाला अहाबने बोटीची दिशा बदलायचे

वल्हे स्थिरपणे व्यवस्थित ठेवायचे काम केले. दुसऱ्या बोटीवरून आहाब ओरडला, "अरे फ्लास्क, वारा नसलेल्या जागी ती अजून ओढ."

"हो सर, ओढतो. फ्लास्कने त्याचे मोठे वल्हे गोल वळवले. तो ओरडला, अरे लोकांनो, मागे व्हा! तिथे समोर तो मासा पोहतो आहे. गर्जना करून ओढा. अरे देवा, मेघगर्जनेसह वीज चमकते आहे!"

मध्यंतरीच्या काळात दुसऱ्या एका बोटीत स्टब त्याच्या ताफ्यालादेखील वल्हवायला लावत होता, पण खूप वेगळ्या विनोदी पद्धतीने, रागाने तो त्यांना सांगत होता पण त्याचा स्वर अर्धा रागीट व अर्धा विनोदी होता.

स्टब ओरडला, "मुलांनो, खेचा, खेचा. मुलांनो, तुम्ही तुमची पाठ वाकवत का नाही?

तुम्ही त्या पाचजणांच्या बोटीकडे लक्ष देऊ नका. तुम्ही जास्तीत जास्त आनंदी रहा. ते राक्षस असले, तरी ते चांगले आहेत. स्पर्म तेलाच्या सोनेरी कपासाठी झिंदाबाद! तुम्ही झोपलेले असतांना राक्षस तुमच्यासाठी अव्यवस्थित, घाणेरडे कपडे आणेल. आपापल्या आयांच्या मुलांनो, जागे व्हा आणि वल्ही ओढा.

त्या राक्षसाचा चाकू हिसकावून घ्या आणि हात मोकळे रहाण्यासाठी तो तुमच्या दातात धरून, वल्ही दोन्ही हातांनी जोरात खेचा. हं अस्स!"

दुसऱ्या बोटीत स्टारबकची पद्धत वेगळी होती. तो खालच्या आवाजात कुजबुजून आज्ञा देत होता. "माझ्या शहाण्या मुलांनो, ओढा, ओढा!" तो त्याच्या ताफ्याला फारसे काही सांगत नसे व तेही त्याला काही विचारत नसत.

उसळणाऱ्या लाटांचे ते नवलपूर्ण व आश्चर्यचकित करणारे दृष्य होते. पाण्याच्या पर्वतप्राय लाटांवर बोटी डुलत होत्या व दुसऱ्या बाजूला घसरगुंडीसारख्या घसरत होत्या. वादळवारे त्यांना धडकत होते. यात मध्येच हार्पूनर्सच्या किंकाळया व वल्ही मारणाऱ्यांची आश्चर्याने आ वासलेली तोंडे व शहारणारे अंग दृगोचर होत होते. कलकलाट करणाऱ्या पिल्लांमागे रानटीपणे कोंबडीने धावावे, तसे शिडे उंच उभारलेले पिक्वॉड बोटींच्या मागे जात होते. हे सर्व मन उचळंबवणारे होते. वाढणारे वारे व पसरणारे धुके याबरोबर स्टारबकने तीन व्हेल माशांचा पाठलाग सुरु केला. अचानक त्याने जोराने पण कुजबुजत्या स्वरात क्विक्वेगला म्हटले, “उभा रहा.”

तो हार्पूनर त्याच्या पायांवर उभा राहीला व त्याला काही ऐकू येईपर्यंत थांबला. “तो त्याच्या पाठीचा उंचवटा आहे. त्या तिथे, तिकडे! तिथे मार.”

क्विक्वेगचे हार्पूनचे लखलखते लोखंडी पाते सूं सूं करत जोराने फेकले गेले --- आणि मग तिथे एकच गोंधळ उडाला. आमच्या लहानशा बोटीच्या मागील बाजूला कडकपणे एक अदृष्य धक्का बसला. शीडे धडाधडा कोसळली. आमच्यामध्ये भूकंपासारखे काहीतरी पसरत गेले. त्याने आम्हाला पांढऱ्या समुद्रफेसात इकडेतिकडे उडवून दिले. वादळवारा, व्हेल व हार्पून सगळे एकमेकात मिसळले. व्हेलला फक्त लोखंडी पात्याचा धक्का बसला व तो निसटला.

पोहत आम्ही आमची तरंगणारी वल्ही पकडू शकलो. आमच्या उजाड बोटीत परत आलो व पाण्याबरोबर डुचमळू लागलो. इतर बोटींना हाका मारून

काही उपयोग नव्हता. वादळात आमचा आवाज त्यांच्यापर्यंत पोचला नसता. आम्ही गुडघ्यापर्यंत पाण्यात होतो. दाट धुक्यात पिक्वॉड कुठेच दिसत नव्हती. पहाट होऊ लागली. निराशेत बुडून आम्ही पार भिजून गेलो होतो. थंडीने अंगावर काटा येत होता.

सर्वात पहील्यांदा क्विक्वेग उडी मारून, त्याच्या कानांवर हात ठेऊन, उभा राहीला. जसे आम्ही ऐकू लागलो, तसे आम्हाला उंच पट्टीतील जोरदार आवाज ऐकू आला. काय होते आहे, हे आम्हाला कळायच्या आत पिक्वॉड दृष्टीपथात आली व शिडे सोडून पिक्वॉडचा पाण्यात गेलेला सर्व भाग बोटीवर आदळला जाण्यापूर्वी आम्ही समुद्रात उड्या मारल्या. पुन्हा सुरक्षितपणे जहाजावर उचलले जाईपर्यंत आम्ही समुद्राच्या जोरदार लाटांशी सामना देत, जीव मुठीत धरून पोहत राहीलो. आम्हाला असे समजले, की इतर तीन बोटी वेळेवर परत आल्या होत्या.

अजूनही थरथरत, पाण्यात जोराने पोहत, मी क्विक्वेगला म्हणालो, “माझ्या जिवलग मित्रा, असे नेहमी होते का?”

त्याने शांतपणे मला समजावले, की हो, असे नेहमी होते. आमच्याबरोबर असलेल्या स्टब आणि फ्लास्कनेही ते कबूल केले.

त्या तीन माणसांनी पाण्यात उलटेसुलटे होण्याबद्दल काही विचार न करता, वाऱ्यावादळात व्हेलचा मागोवा घेतांना सावधगिरी बाळगत, स्टारबक्सने दणक्यात चालवलेल्या बोटीविषयी काही वेगळे वाटून न घेता

आणि आमच्या कप्तानाची मॉबी डीकचा सूड घेण्याची वेडी इच्छा लक्षात घेता, एकच योग्य गोष्ट करणे मला शक्य होते.

मी बोललो, “क्विक्वेग, मी खाली जाऊन माझे कच्चे इच्छापत्र तयार करतो. चल. तू माझा वकील व सल्लागार असणार आहेस.”

# प्रकरण ८

# मॉबी डीकचे भक्ष्य



छळ करणाऱ्या समुद्राला, बेफाम वाहणाऱ्या वाऱ्याला व उसळणाऱ्या लाटांना न शोभणाऱ्या केप ऑफ गुड होपच्या या नावाच्या भागाच्या नैऋत्येला आम्हाला एक दुसरे जहाज भेटले. ते अल्बाट्रॉस होते. गंजलेल्या कडांचे, फाटकेतुटके कपडे घातलेले दाढी वाढलेले खलाशी असलेले, खूप काळ किनाऱ्याला न लागलेले, असे ते होते. कप्तान अहाबने त्या जहाजावरील लोकांना विचारले, "तुम्ही पांढरा व्हेल पाहिला का?

पण अल्बाट्रॉसच्या कप्तानाने बोलण्यासाठी कर्णा तोंडाला लावला, तेव्हा तो त्याच्या हातातून सुटून समुद्रात पडला. त्यामुळे त्याचा आवाज ऐकू येईना. मग आम्ही पुढे निघून गेलो. नंतर लगेचच आम्हाला घरी निघालेले एक टाऊन-हो नावाचे व्हेलर जहाज दिसले. यावेळेस अहाबने परस्पर भेटी घडवून संवाद साधला. टाऊन-होच्या ताफ्यातील काही खलाशी पिक्वॉडवर आले व त्यांनी टॅष्टेगोला कुजबुजत त्यांच्या जहाजाचे गुपित सांगितले. नंतर जेव्हा त्याने ते आम्हाला सांगितले, तेव्हा आमची मॉबी डिकमधील रुची वाढली.

टाऊन-हो वरील ऑफिसरने खलाशांना डेक धुवायची अन्यायकारक आज्ञा दिली. त्यावरून तिथे मारामारी झाली. स्वसंरक्षणासाठी खलाशाने ऑफिसरला खाली पाडून उडवले. इतरजण त्यात सहभागी झाले आणि तिथे बंड झाले.

स्टीलकील्ट नावाचा खलाशी मुख्य ऑफिसर रॅडनेला जवळजवळ ठार करणार होता, तेव्हा एक हाक आली. मॉबी डिक दिसला होता. रॅडनेची बोट पहील्यांदा उतरवली गेली. तो भाला हातात घेऊन उभा होता, तेव्हा बोटीच्या कडेला तो पाण्याबरोबर वहात गेला व सरळ मॉबी डिकच्या जबड्यात जाऊन पडला व चावला गेला. ते महाकाय धूड उसळी मारून उंच गेले व मग पाण्यात जाऊन दिसेनासे झाले. जेव्हा त्याने परत वर उसळी घेतली, तेव्हा रॅडनेच्या लाल लोकरीच्या शर्टाच्या चिंध्या त्याच्या दातांमध्ये दिसल्या. सर्व चार बोटींनी त्याचा पाठलाग केला. पण त्याना चुकवून, तो नाहीसा झाला.

टाऊन-होची गोष्ट ऐकल्यावर, आमच्या सर्वांच्या मनात मॉबी डिक भरून राहीला. डॅगोने निरीक्षण करतांना, भव्य पांढरे धूड पाण्यात वरखाली होतांना बघितले. डॅगो ओरडला, "तो आपल्यासमोर पाण्याला छेद देत उसळी घेतो आहे व बुडतो आहे. पांढरा व्हेल, पांढरा व्हेल!"

अहाबने ताबडतोब आज्ञा दिल्या. तिन्ही बोटींच्या पुढे त्याची बोट प्रथम जहाजातून खाली सोडण्यात आली. भले मोठे, गरगरीत फिकट पिवळसर पांढऱ्या रंगाचे शेकडो यार्ड लांबीरुंदीचे धूड पाण्यावर तरंगत होते. त्याच्या मध्यभागातून अगणित लांब हातांसारखे काही वळवळत होते. त्याला दिसेल असा चेहरा किंवा पुढील बाजू नव्हती. तो म्हणजे फक्त भुतासारखा आकारहीन जिवंत प्राणी होता.

पुन्हा तो अस्पष्ट ओढल्यासारखा आवाज काढत, अदृष्य झाला, तेव्हा स्टारबक म्हणाला, "या पांढऱ्या भुतापेक्षा मला मॉबी डिक दिसायला हवा होता."

फ्लास्क बोलला, "सर, हे काय होते?"

तो मोठा जिवंत स्क्विड [ऑक्टोपससारखा एक जलचर] होता. अशी अंधश्रद्धा आहे, की काही व्हेल पकडणारी जहाजे त्याना स्क्विड दिसला, तर ते सांगण्यासाठी परत बंदराकडे जातात.

अहाब काही बोलला नाही. त्याने त्याची बोट जहाजाकडे वळवली. आम्ही सगळेही त्याच्यामागून गेलो.

पण स्क्विड दिसणे म्हणजे काय, याबद्दल क्विक्वेगचे मत वेगळे होते. 'जेव्हा 'स्क्विड' जवळ दिसतो, तेव्हा तुम्हाला लगेच 'स्पर्म व्हेल' दिसतो. दुसऱ्या दिवशी उकाडा होता. आम्हाला सगळ्यांना झोप येत होती. पण क्विक्वेग म्हणाल्याप्रमाणे सगळ्यांना लगेचच भला मोठा स्पर्म व्हेल, एखाद्या जाड नागरिकाने रमतगमत, गरम दुपारी पाइप ओढत चालावे, तसा आळशीपणे पोहतांना दिसला.

पण तो पाइप म्हणजे त्या गरीब बिचाऱ्या व्हेलचा मागील घाण बाहेर पडणारा भाग होता. जहाजावरचे सगळे झोपाळू लोक जागे होऊन लहान बोटीतून खाली उतरू लागले. आमच्या आवाजामुळे व्हेलला काही सूचना मिळाली असावी. कारण त्याने त्याची चाळीस फुटी शेपटी हवेत उडवली व पाण्यात डुबकी मारून दिसेनासा झाला व पुन्हा मनोऱ्यासारखा वर आला.

जिथे व्हेल पुन्हा दिसला, तेथून स्टब जवळ असल्याने, त्याला व्हेलवर पहीला हल्ला करायचा मान मिळाला. "सुरवात करा. माझ्या माणसांनो, वादळी गडगडाटासारखा त्याच्यावर हल्ला करा. पण थंड रहा. माझ्या माणसांनो, मिशा पिळा. त्याच्यावर झडप घाला."

"ओहो! वाहवा रे!" इंडियन लोकांनी किंचाळून प्रत्युत्तर दिले. त्यांच्या काही जुन्या लढायांमधील घोषणा आकाशापर्यंत आवाज नेत, दुमदुमल्या.

त्याच्या रानटी किंचाळण्याला इतर बोटीतील लोकांनी तितक्याच जोराने किंचाळून, उत्तर दिले. पिंजऱ्यात फेऱ्या मारणाऱ्या वाघासारखे बसल्या जागी मागेपुढे होत, डॅगो ओरडला, "की---ही! की---ही!

क्विक्वेग किंचाळला, “का---ला! कू---हू! स्टबच्या बोटीतील माणसे, स्वागतपर आरडाओरडा ऐकू येईपर्यंत, जोर लावत खेचत राहिले.

“उभा रहा. टॅष्टेगो, ते त्याला मार.”

हार्पून नेम धरून फेकले गेले. सर्वत्र कल्ले असलेल्या शार्कसारखी बोट जणू उकळत्या पाण्यात तरंगू लागली. ती मार्गक्रमणा करत, जणु पूर्ण अटलांटिक आणि पूर्ण प्रशांत महासागर ओलांडत होती. शेवटी बोट व व्हेल एकदाचे समोरा समोर आले. स्टब ओरडला, “जोरदार प्रयत्न करून ओढा, जोरात ओढा!”

सगळ्यांनी गोल वळून, व्हेलकडे तोंड केले आणि बोट व्हेलकडे खेचायला सुरवात केली. स्टबदेखील बोट खेचत होता. स्टबने एकामागून एक टोकेरी शस्त्रे व्हेलच्या अंगात घुसवायला सुरवात केली. लवकरच सर्व बाजूंनी त्या राक्षसाच्या अंगातून लाल रक्ताचा पूर वाहू लागला. त्या रक्ताळलेल्या पाण्यातून पडणारे सूर्यकिरण परावर्तित होऊन प्रत्येक माणसाच्या चेहऱ्यावर पडू लागले. त्यामुळे ती माणसे लाल असल्यासारखी चमकू लागली.

स्टब ओरडला, “खेचा!” आणि बोट व्हेलच्या बाजूला जाऊ लागली. लांबवर वाकलेल्या व्हेलच्या डोक्याकडे जात, स्टीलचे टोकेरी टोक असलेला भाला स्टबने सावकाशीने व्हेलच्या हृदयात घुसवला व तिथेच ठेवत तो काळजीपूर्वक अधिकाधिक आत आत नेऊ लागला.

व्हेलने एक शेवटचा आचका देत बोटीवर वेड्यासारखा जोरदार, गरम फवारा मारला. मग तो थांबला. परत एकदा व्हेल गोलगोल होत दिसेनासा


झाला. कल्ले वरखाली करत, जोरदार श्वासोच्छवास करत व काही मोडल्यासारखा आवाज करत व्हेल पोहत राहीला. लाल रक्ताचे फवारे हवेत उडत राहीले व व्हेलच्या कडेने समुद्रात मिसळत राहीले. त्याचे हृदय फुटले.

स्टबने तोंडातून त्याचा पाइप बाहेर काढला. राख पाण्यावर झटकली आणि त्याने आताच बनवलेल्या व्हेलच्या प्रचंड प्रेताकडे विचारपूर्वक बघत उभा राहिला.

## प्रकरण ९

## टाळता न येणाऱ्या मरणाचा वेडा धर्मगुरू

तीन बोटी ते जणू बक्षीस मिळालेले धूड ओढत पिक्वॉडकडे नेऊ लागले. आम्ही ओढत असलेले धूड इतके प्रचंड मोठे होते, की आमचे छत्तीस हात आणि एकशे ऐंशी बोटे यांनी ते काम पूर्ण केले. स्टबने मारलेला व्हेल जहाजापासून काही अंतरावर होता. मेलेल्या व्हेलचे दृष्य अहाबला दुःख देत असल्याचे दिसत जसे काही त्याला आठवण होत होती की मॉबी डिक अजून मोकळा व जिवंत होता. त्याला मारायचे अजून शिल्लक होते. ते महाकाय शरीर आमच्या जहाजाच्या लांबीला बांधले गेले. चांगल्या उद्दीपित मनस्थितीत



The Mate Was Thrown into the Air.

स्टबने जेवणासाठी व्हेलचा स्टेक [माशाच्या शरीराचा मागील भाग] शिजवण्याची आज्ञा दिली. दुसरा दिवस म्हणजे मेलेला मासा कापण्याचा कठीण भाग होता. संत्र्याच्या बाहेरील कडक सालाप्रमाणे माशाच्या कातडीखालील चरबी एक फूट जाडीची असते. स्टब आणि स्टारबकने लांब फावड्याने, त्या जाड भागाला भोक पाडले. मग एक

भला मोठा हुक त्यात घालून, ताफ्याने जोर लाऊन, पहिले मास ओढून काढले. मग जहाजाच्या खालील खोलीतील माणसांनी त्याची गुंडाळी करायला सुरवात केली. ही कृती सर्व चरबी निघेपर्यंत परत परत केली गेली. एका व्हेलमधून, शंभर पिपे तेल निघते. दहा टन वजनाचे ते तेल असते.

दुसऱ्या एका नान्टुकेटहून निघालेल्या जेरोबोम नावाच्या व्हेलर जहाजाच्या ‘वल्हवा रे’ च्या आरोळीमुळे आमचे काम मध्येच थांबले. जेव्हा त्यातून खाली उतरलेली बोट आमच्या दिशेने येऊ लागली, तेव्हा स्टारबकने त्यांच्या कप्तानाला भेटण्यासाठी, एका शिडीची आज्ञा दिली. पण जेरोबोमचा अधिकारी कप्तान मेह्यूने हात हलवून सांगितले, की ते पिक्वॉडवर येत नाही आहेत. काळजीपूर्वक जहाज वल्हवून, जेरोबोमच्या खलाश्यांनी ते आमच्या जहाजाच्या शेजारी लावले, जेणेकरून संवाद साधता यावा. त्यांच्या जहाजावर वाईट रोगाची साथ सुरु असल्याने ते आमच्या जहाजावर येणार नव्हते.

स्टबला वाटले की त्याने जहाज वल्हवणाऱ्या एका खलाशाला ओळखले. तो छोटासा, रानटी डोळयांचा, चेहऱ्यावर वांग असलेला व सोनेरी केसांचा तरुण होता. स्टब बोलला, “तो गॅब्रिएल असला पाहीजे!”

आम्ही इतर ताफ्याकडून या चेहऱ्यावर वांग असलेल्या विचित्र माणसाबद्दलच्या गोष्टी ऐकल्या होत्या. चेहऱ्यावर वांग असलेल्या या लोकांचा एक अमेरिकन धार्मिक गट होता. ते प्रार्थना करतांना अंग हलवत असत. एक सामान्य खलाशी म्हणून जहाजावर येऊन, गॅब्रिएलने स्वतःला धर्मगुरू म्हणून घोषित केले. त्याने स्वतःला देवदूत गॅब्रिएल म्हणवून, जहाजावर ताबा

मागितला. जेव्हा कप्तानाने त्याला पहिल्या सोयीस्कर बंदरावर जमिनीवर उतरवण्याची धमकी दिली, तेव्हा गॅब्रिएलने चमत्काराच्या लहानसहान बाटल्या उघडायला सुरवात केली. कप्तानाने त्याचा बेत अंमलात आणायचा ठरवल्यास, ताफ्याला काय काय भोगावे लागेल याचा पाढा त्याने वाचला.

तो इतका ठाम आणि स्वतःवर विश्वास असलेला होता, की खलाशी कप्तानाकडे जाऊन, सांगू लागले की त्याला जहाजातून बाहेर काढले तर एकही माणूस जहाजावर रहाणार नाही. त्याला कुठलीच शिक्षा न करण्याचा आग्रह त्यांनी केला. त्यामुळे गॅब्रिएलला जहाजावर पूर्ण स्वातंत्र्य मिळाले.

जेव्हा जेरोबोमवर साथ सुरु झाली, तेव्हा तर गॅब्रिएलचा भाव आणखीनच वाढला. त्याने असे जाहीर केले की, फक्त त्याच्या आज्ञेमुळेच जेरोबोमवर प्लेग सुरु झाला आहे आणि त्याला खुश केले तरच तो जाईल. तो म्हणेल त्यावर खलाशांनी विश्वास ठेवला.

त्या सर्वांनी पांढऱ्या व्हेलबद्दल ऐकले होते आणि ते त्याची शिकार करायला उत्सुक होते. जोपर्यंत गॅब्रिएलने त्याच्या रानटी, उसळणाऱ्या पद्धतीने असे न करण्याबद्दल बजावले, तोपर्यंत सर्वजण त्याची शिकार करण्यासाठी उत्सुक होते. तो म्हणाला मॉबी डिक या व्हेलच्या शरीरात त्याचा देव आहे.

तरीही वर्षभराने एक रुंद पांढरी सावली पाण्यातून उसळली आणि मुख्य ऑफिसर हेन्री मॅकने सर्वांना त्या व्हेलचा पाठलाग करण्यासाठी चेतवले. शेवटी मॅकने त्याच्या बोटीत येण्यासाठी पाच खलाशांचे मन वळवले. गॅब्रिएलने त्याचे

मरणाबद्दलचे भविष्यकथन चालूच ठेवले. बोटीतील खलाशांनी लोखंडी पाते त्या समुद्री पशूच्या शरीरात घुसवले.

अचानक रुंद, पांढरी सावली पाण्यातून उसळली आणि त्या व्हेलच्या चपळ हालचालींमुळे खलाशांचे श्वास रोधले गेले. पुढच्याच क्षणी एक दुर्दैवी खलाशी हवेत फेकला गेला आणि पडतांना एक गोलाकार काढून, समुद्रात पन्नास यार्डांवर पडला. बोटीचे काही नुकसान झाले नाही. इतर कुणा खलाशाचा केसही वाकडा झाला नाही. पण तो खलाशी कायमचा समुद्रात बुडाला.

यावर कप्तान मेह्यूने अहाबला विचारले, की त्याला संधी मिळाल्यास त्याने मॉबी डीकला मारावे का.

अहाब उत्तरला, “अरे”, तेव्हा गॅब्रिएल उडी मारून, त्याच्या पायाशी गेला व त्या म्हाताऱ्या माणसाकडे निरखून बघू लागला.

खाली केलेल्या बोटाने भावविभोरतेने गॅब्रिएल म्हणाला, “देवाचा अपमान करणाऱ्या मसेयकडे बघ. तिथे खाली तो मेला. अशा मरणाचा धसका घे!”

अहाब असे म्हणत बाजूला झाला, की जर त्यांची जहाजे भेटली, तर नान्टुकेटला जेरोबोमच्या एका ऑफिसरला देण्यासाठी नान्टुकेटला त्याला एक पत्र दिले गेले होते, ते त्याला आठवले. स्टारबक ते शोधायला गेला आणि लगेच एक ओलसर, फाटत आलेल्या, पत्राचे तुकडे घेऊन आला. अंधारी लॉकरमध्ये ठेवल्याने, त्यावर शेवाळे साठले होते.

स्टारबकने एका लांब काठीला थोडी चीर पाडून त्यात ते पत्र लटकवले व ते खालील बोटीत दिले. स्टारबक हे करत असतांना, अहाबने त्या पाकिटावर लिहिलेली अक्षरे वाचण्याचा प्रयत्न केला.

‘ मिस्टर हर” ---हो, एका बाईचे अक्षर, त्या माणसाची बायको, मी पैजेवर सांगतो –

-- मिस्टर हॅरी मसेय, जेरोबोम जहाज. हे मसेयकरता आहे व तो तर मेला आहे!”

गॅब्रिएल अहाबला ओरडून बोलला, “तू ते ठेऊन घे. तू पण लवकरच त्या मार्गाने जाणार आहेस!”

अहाब किंचाळला, “मला शाप देतोस! कप्तान मेह्यू, हे पत्र घेण्यासाठी उभा रहा.”

पण गॅब्रिएलने ते हिसकावून घेतले. त्याच्या कडांवर चाकू फिरवून, ते उघडले आणि ते पिक्वॉडमध्ये फेकून दिले. ते सरळ अहाबच्या पायाशी पडले.

# प्रकरण १०

## जहाजावर राक्षस

नंतर आम्हाला व्हेलचा कळप लागला. स्पर्म व्हेलपेक्षा या माशांचे तेल कमी प्रतीचे होते. त्यामुळे त्यांची शिकार करायला नको, असे मी गृहीत धरले. पण मी चुकत होतो. कारण बोटी उतरवण्यासाठी ओरडा ऐकू आला. स्टब आणि फ्लास्क उंच कल्ले असलेला व्हेल शोधू लागले.



Fedallah Reads a Secret Message.

एका व्हेलला हार्पून मारून, दोन बोटी त्याच्या जवळ गेल्या. स्टब आणि फ्लास्कने गोल फिरून, तो मरेपर्यंत, व ओढून नेण्यासाठी तयार होईपर्यंत, पाळीपाळीने त्याच्या अंगात टोकेरी भाले घुसवले."

स्टब म्हणाला, मला नवल वाटले, की घाण वास येणाऱ्या माशाच्या पोटातील मासामध्ये म्हाताऱ्या [अहाब]ला काय मोठी रुची आहे?

फ्लास्कने विचारले, "तू कधी आकर्षण शक्तीबद्दल ऐकले नाहीस का? एकदा एका जहाजाच्या डेकच्या उजव्या बाजूवर स्पर्म व्हेलचे डोके येऊन पडले आणि त्याच वेळी डावीकडे मेलेला साधा व्हेल बांधलेला होता. तर मग त्या साध्या व्हेलला कधी मासासाठी उलटेही केले गेले नाही."

स्टब म्हणाला, "तू हे कुठे ऐकलेस?"

फ्लास्क उत्तरला, "मी हे फेडल्लाहकडून ऐकले. तो भुतासारखा माणूस त्याचा गोडवा वापरून जहाज रसातळाला नेईल. स्टब, दुष्ट सापाच्या डोक्यासारखा त्याचा एक बाहेर आलेला दात दिसत नसतो का?"

"मला वाटते, फेडल्लाह हा वेष बदललेला राक्षस आहे. आपल्याला त्याची राक्षसी शेपूट दिसत नाही, कारण तो ती गुंडाळून त्याच्या खिशात ठेवतो.

स्टबने री ओढली, "हो. आणि तो त्याच्या बुटात झोपतो, नाही का?, कारण जोरात लाथ मारायची त्याची प्रवृत्ती जगजाहीर होईल म्हणून, राक्षसी फेडल्लाह त्याचे बकऱ्यासारखे पाय कुणाला बघू देत नाही. मी पैजेवर सांगतो, की त्याने म्हाताऱ्याबरोबरसुद्धा अशी बोली केली असणार. जर फेडल्लाहने मॉबी डीकला त्याच्या स्वाधीन करण्याचे वचन दिले, तर अहाब त्याचा आत्माही त्याला काढून देईल."

"स्टब, तू विनोद करतो आहेस का? फेडल्लाह असे कसे करेल?"

“फ्लास्क, मला माहिती नाही. पण मी तुला सांगतो, राक्षस फेडल्लाह हा विचित्र व दुष्ट मनुष्य आहे. पण नीट बघ --- आपण इथे आहोत. बोट पुढे खेच आणि आपण या व्हेलला जहाजाच्या कडेला आणू.

काही वेळाने, दोन बोटींनी ते ओझे ह्ळूहळू ओढत पिक्वॉडच्या मागे आणून ठेवले.

“स्टब, तुला काय वाटते, फेडल्लाहचे वय काय आहे?”

उत्तर देण्यासाठी स्टबने पिक्वॉडच्या सर्वात उंच खांबाकडे बोट दाखवले.

“तुला तिकडे ते मुख्य शीड दिसते आहे? असे समज की ते म्हणजे आकडा एक आहे. आता जहाजावर साठवलेल्या सर्व पिपांवरील गोलाकार धातूच्या वा लाकडी वेटोळयांची लांबी मोज. शीडाजवळील अशा सर्व वेटोळयांची लांबी जेवढी भरेल, तेवढी शून्ये एकावर दिल्यास, ते त्याचे वय असेल. पण जगातील अशा सर्व वेटोळयांची लांबी लक्षात घेतली तरीही तेवढी शून्ये त्याचे वय लक्षात घेण्यास पुरेशी होणार नाहीत.”

“स्टब, पण पूर्वी तू म्हणालास की तुला त्याला डेकवरून फेकून द्यायला आवडेल. जर तो चिरंतन रहाणार असेल, तर त्यामुळे काय चांगले होईल?”

“त्याला पाण्यात बुडवा किंवा त्याचे डोके खाली करा.”

“जर त्याने तोच डाव तुझ्यावर उलटवला तर?”

मला त्याने असा प्रयत्न केलेला बघायला आवडेल. फ्लास्क, पण त्या राक्षसाचा विषय जाऊ दे. तुला असे वाटते का, की मी त्याला घाबरतो? जर त्याने काही खोडी काढली, तर मी त्याच्या खिशातून त्याची शेपूट काढून त्याच्यावर अचानक हल्ला करेन व त्याला लाजीरवाणे वाटायला लाऊन पळवून लावेन."

आणि त्याच्या शेपटीचे तू काय करशील, स्टब?"

"काय करेन? आपण घरी जाऊ तेव्हा, बैलाला मारायचा चाबूक म्हणून विकेन. दुसरे काय करणार?" फ्लास्कने स्टबकडे गोंधळलेल्या नजरेने बघितले. त्याने विचारले, "तू जे जे बोललास, तसे तू करणार आहेस का?"

स्टब बोलला, "करेन किंवा नाही करणार. तूर्तास तर आपण जहाजावर आहोत. स्पर्म व्हेलच्या विरुद्ध बाजूला असलेल्या उजवीकडील व्हेलला बांधण्यासाठी जहाजातील साखळदंड तयार होते.

पिक्वॉडच्या डेकच्या उजव्या बाजूवर डोके येऊन पडलेल्या स्पर्म व्हेलकडे निर्देश करत, फ्लास्क म्हणाला, "मी तुला सांगितले नव्हते का? मी तुला सांगितले होते, की फेडल्लाह ते करेल. तुला लवकरच दिसेल, की हे डोके दुसऱ्या डोक्याजवळ ठेवलेले असेल.


काही वेळात, फ्लास्क जे बोलला होता, ते खरे ठरले. जेव्हा व्हेलचे डोके उजवीकडे टांगले गेले, तेव्हा मी फेडल्लाहला त्याचा अभ्यास करतांना पाहीले. जसे काही भविष्यातील गुप्त संदेश वाचल्यासारखा, तो त्याच्या

तळहातावरील रेषांशी व्हेलच्या अंगावरील सुरकुत्यांची तुलना करून बघत होता.

कप्तान अहाब अशा तऱ्हेने उभा होता की, फेडल्लाह पूर्णपणे त्याच्या सावलीत होता. जर फेडल्लाहला सावली असलीच, तर ती चमत्कारिकपणे अहाबच्या सावलीत मिसळून गेली होती.

# प्रकरण ११

## क्विक्वेगने ते परत केले



स्पर्म व्हेलचे डोके बाजूला टांगलेल्या अवस्थेत, पिक्वॉड पुढे सरकत होती. महत्वाचे काम करायचे होते --- खजिना काढायचे!

खजिना म्हणजे किंमती तेल होते. व्हेलच्या कपाळाखालील केस नावाच्या पिशवीत, ते प्रचंड प्रमाणात सापडत असते. स्पर्म व्हेलचे डोके कापतांना काळजीपूर्वक, केस फुटणार नाही, अशा तऱ्हेने कापावे लागते, नाहीतर सुमारे ५०० गॅलन तेल फुकट जाते.

टॅष्टेगो जहाजाच्या अगदी कडेला चढला. त्याच्या शरीराचा काही भाग पाण्याबरोबर ओढल्या जाणाऱ्या व्हेलच्या डोक्यावर येत होता. जहाजाच्या कडेला स्वतःला सुरक्षित करत, दोरीने तो खाली व्हेलच्या डोक्यावर उतरला. ताफ्यामधील एकाने त्याला लहान दांडा असलेले फावडे दिले. पण त्याने एकदम खणायला सुरवात केली नाही. काळजीपूर्वक त्याने पहील्यांदा व्हेलच्या कातडीवर ठोकत तिचा अंदाज घेतला.

जिथे खणणे सुरु करायचे अशी योग्य जागा सापडल्यावर, त्याने थोडे खणून, लोखंडी बादलीसारखे काही दोरीच्या टोकाला बांधून, ती तिथे आत सोडली. दोरीचे दुसरे टोक ताणून डेकवरील दोन माणसे उभी होती.

टॅष्टेगोने एका काठीने ती बादली व्हेलच्या केसमध्ये आत बुडेपर्यंत ढोसली. मग डेकवरील लोकांनी दोर खेचत, तेलाने भरलेली बादली बाहेर काढली व एका मोठ्या टबमध्ये रिकामी करुन टॅष्टेगोला परत केली. जसजशी व्हेलची केस रिकामी होत गेली, तसतशी बादली व दोर जास्त जास्त आतपर्यंत घालावे लागत होते. असे शंभर वेळा केल्यावर, ते व्हेलच्या कपाळातून वीस फूट खोल गेले.

अचानक टॅष्टेगोने स्वतःचे डोके पहिल्यांदा केसमध्ये घातले. बुडबुड्यांचा भयानक जोराचा आवाज येऊन --- तो दिसेनासा झाला.

बादलीत पाय घालून डॅगो ओरडला, “डेकवरील माणसा” त्या माणसाला डॅगोने दोर ढिला सोडून बादली खाली करायला सांगितली.

पण मग एक भयंकर काहीतरी तुटल्याचा आवाज आल्यामुळे, प्रत्येकजण थिजल्यासारखा झाला व भीतीने इकडेतिकडे बघू लागला. व्हेलचे डोके ज्याला टांगले होते, त्या दोन हुकांपैकी एक हुक मोडून पडला. व्हेलचे डोके जहाजाच्या कडेला लोंबू लागले, तेव्हा दुसरा हुकही तुटायला आल्यासारखे वाटले. गडगडाटासारखा डॅगो बाजूच्या दोरीला लटकला. पण बिचारा टॅष्टेगो जिवंतपणी व्हेलच्या कपाळाच्या आत समुद्राच्या तळाशी बुडाला.

झटपट एका क्षणी तलवार हातात घेतलेली एक नागडी आकृती तोल सांभाळत संरक्षक भिंतीवर उभी असलेली दिसली. पुढच्याच क्षणी माझ्या शूर क्विक्वेगने टॅष्टेगोच्या सुटकेसाठी पाण्यात सूर मारला. त्यामुळे पाणी जोरात वर उसळले.

काही वेळात आम्ही स्मशानातील गवतातून एखादा हात वर यावा, तसा समुद्रात एक हात विचित्रपणे तरंगत वर येतांना पाहिला.

डॅगो ओरडला, “दोन्ही, दोन्ही --- ते दोन्ही आहेत!

लगेच आम्हा सर्वांना क्विक्वेग एका हाताने तरंगत व एका हाताने त्या इंडीयनचे लांब केस धरून, त्याला ओढत आणतांना दिसला.

त्या सुटकेचे वर्णन नंतर जेव्हा क्विक्वेगने केले, तेव्हा ते आम्हा सर्वांना आश्चर्य चकित करणारे वाटले. क्विक्वेग बुडणाऱ्या व्हेलच्या डोक्यामागे गेला आणि तळाशी जाऊन, त्याच्या तलवारीने व्हेलच्या अंगाला भोके पाडली. हात आत घालून, त्याच्या हाताला टॅष्टेगोचा पाय लागला .त्याला खेचून बाहेर काढून

वर नेणे म्हणजे त्रास असल्याचे क्विक्वेगच्या लक्षात आले. विचारपूर्वक झटपट कृती करत त्याने जोराने पाय ओढला. त्याला आशा होती, त्याप्रमाणे त्याने टॅष्टेगोला, त्या इंडीयनला, कोलांटी उडी मारायला लावली. नंतर प्रयत्न करून त्याच्या हाताला टॅष्टेगोचे डोके लागले. मग त्याने त्याला खेचत कसेबसे वर आणले.

# प्रकरण १२

## पांढऱ्या व्हेलच्या मागावर



.

“जहाजावरील माणसांनो, तुम्हाला पांढरा व्हेल दिसला का? तोंडात त्याचे ट्रम्पेट ठेऊन, डेकवर उभ्या राहिलेल्या म्हाताऱ्या अहाबने जवळून जाणाऱ्या, इंग्लिश झेंडा फडकवणाऱ्या जहाजाला ते विचारले अहाबचा हस्तिदंती रंगाचा पाय सॅम्युएल एंडरबायच्या कप्तानाच्या पूर्णपणे लक्षात आला

होता. हा थोराड, बळकट, उन्हाने रापलेला व दिसायला चांगला, साधारण साठीचा सभ्य गृहस्थ होता. त्याच्या जाकीटाचा रिकामा उजवा हात त्याच्या मागे लटकत होता.

अहाबने परत विचारले, “तुम्ही पांढरा व्हेल पाहिला का?”

शर्टाची बाही वर करुन, स्पर्म व्हेलच्या हाडापासून बनवलेला पांढरा हात दाखवत, कप्तान उत्तरला, “हे पाहीले का?”

एका मिनिटापेक्षा कमी वेळात त्या दुसऱ्या जहाजाला भेट देण्यासाठी अहाबची बोट खाली सोडण्यात आली. जेव्हा म्हातारा त्या जहाजावर चढला, तेव्हा एंडरबायचा कप्तान पुढे आला व स्वागतासाठी त्याचा हस्तिदंती हात पुढे केला. अहाबने त्याच्या हस्तिदंती पायाने त्याला फुली काढली व बोलला, “अरे, अरे! आपण हाडांनी एकमेकांचे स्वागत करू --- हात आणि पाय. पांढऱ्या व्हेलने तो हात तोडला का?”

कप्तान बोलला, “हो. काही चार पाच व्हेल्सची शिकार करण्यासाठी आम्ही आमची लहानशी बोट खाली केली. एका बोटीने त्यातील एका दुधासारखे पांढरे डोके असलेल्या व पाठीला उंचवटा असलेल्या व्हेलला बांधले.

अहाब किंचाळला, “तो तो होता, मॉबी डिक!”

“आणि त्याच्या उजव्या अंगात हार्पून्स घुसलेले होते.”

अहाब किंचाळला, “ते माझे होते. ती माझी लोखंडी टोकदार शस्त्रे होती. “पुढे सांग, पुढे काय झाले, ते सांग.”

“तो फुत्कार टाकत माझ्यावर चाल करून आला.”

“अरे बाप रे! त्याला त्याची सुटका करून घ्यायची असावी. जुनी युक्ती. मला तो माहिती आहे.”

“त्याच्या दातात आमची दोरी अडकली आणि आम्ही जेव्हा ती ओढली, तेव्हा आमची बोट त्या व्हेलच्या अंगाच्या उंचवट्या वर गेली. माझ्या पूर्ण आयुष्यात बघितलेल्या व्हेल्सपैकी हा सर्वात मोठा व शानदार व्हेल होता. तो घुश्य्यात असला तरी मी त्याच्यावर कब्जा मिळवायचा प्रयत्न करू लागलो. मी माझ्या सहकाऱ्याच्या बोटीत उडी घेतली, जवळील हार्पून उचलले आणि ते त्याच्या अंगात घुसवले.”

अहाब उत्सुकतेने ऐकत होता.

“पुढची मला माहिती असलेली गोष्ट म्हणजे, त्याच्या शेपटीने तडाखा मारल्याने संगमरवरी मनोऱ्यासारखे पाणी बाहेर उसळले व काळे धुक्यासारखे काही पसरल्यामुळे, मला काही दिसेनासे झाले. अचानक शेपटी पाण्याखालून आली व तिने माझ्या बोटीचे दोन तुकडे केले व त्या तुटक्याफुटक्या लाकडी तुकड्यांमधून तो पसार झाला.”

अहाब किंचाळला, “पुढे काय झाले?”

त्याच्या अंगात घुसलेला माझा हार्पून मी पकडला. क्षणभर मी त्याला चिकटून राहीलो. पण समुद्राच्या जोरदार लाटांनी मला दूर फेकले. क्षणार्धात व्हेल परत पाण्याखाली गेला. त्यानंतर दुसरा शापित हार्पून माझ्याजवळून जाऊन, माझ्या खांद्यात घुसला. मी पाण्याखाली जाऊ लागलो. मला वाटले --- नक्कीच आता काही मी वाचत नाही."

खांद्याखाली जिथे त्याचा हात संपला होता, तिथे अहाबने निरखून पाहिले.

"दैववशात अचानक माझ्या पूर्ण हाताचे मास कापले गेले. ते माझ्या कंबरेशी आले आणि मी वर आलो".

आमच्यात सामील झालेल्या जहाजावरील डॉक्टरने गोष्ट संपवली. "हो, ती दोन फुटाची जखम होती. मग ती वाढली आणि मला हात कापावा लागला."

अहाबने विचारले, "व्हेलचे काय झाले?" कारण त्याला त्यात रुची होती.

कप्तान बोलला, "आम्ही त्याला दोनदा परत पाहीले."

अहाबने किंचाळून विचारले, "पुढे काय झाले? परत तू त्याच्यावर स्वार होऊ शकला नाहीस का?"

"मला तसा प्रयत्नदेखील करायचा नव्हता. एक हात तुटला, तेवढे बास झाले नाही का?" इंग्लिश कप्तानाने अहाबच्या हस्तिदंती पायाकडे बघून म्हटले, "तुला असे वाटत नाही का, की त्या व्हेलला सोडून देणेच श्रेयस्कर होते?"

अहाब ठामपणे बोलला, “कदाचित तसे असेल. पण मी अजून त्याच्या मागे आहे. तो कुठल्या दिशेने गेला?”


“मला वाटते तो पूर्वेकडे गेला --- “

मग फेडल्लाहकडे वळत, एंडरबायचा कप्तान कुजबुजला, “देवा रे, कप्तान अहाब वेडा आहे का?” पण त्याच्या ओठांवर बोट ठेवत, फेडल्लाह आमच्या बोटीचे वल्हे घेण्यासाठी, सॅम्युएल एंडरबायच्या संरक्षक भिंतीवरून घसरत गेला. अहाब लगेचच लहान बोटीत उभा असलेला दिसला. त्याची माणसे त्यांची वल्ही घेऊन तयार होती. दुसऱ्या बोटीतील कप्तानाने त्याला हाक मारायचा निरर्थक प्रयत्न केला. एंडरबायकडे पाठ करून, पिक्वॉडच्या कडेला येईपर्यंत, अहाब एखाद्या पुतळ्यासारखा उभा राहीला.

# प्रकरण १३

## मरणदारातून परत

या वेळेपर्यंत आमचे जहाज किंमती मालवाहू जहाज झाले होते. त्यात अतोनात पिपे व्हेलचे तेल डेकखाली साठवलेले होते. त्याच्या संरक्षणासाठी आमची माणसे आठवड्यातून दोनदा त्या पिपांवर समुद्राचे पाणी मारत असत.



Queequeg Tries Out His Coffin.

याची दोन कारणे होती. पाण्यामुळे लाकडी पिपांचे झाकण घट्ट व हवाबंद रहात असे व दुसरे म्हणजे, खलाशी पंपातून येणारे पाणी तपासून त्यात तेल मिसळले जात नाही ना हे बघत. अशा तऱ्हेने पिपातून गळती होत नाही ना, हे बघितले जाई.

आम्हाला एंडरबाय भेटल्यानंतरच्या सकाळी, आमचे खलाशी पिपांवरून पंपाने पाणी मारत होते. त्याना बरेचसे तेल वर येतांना व पाण्यात मिसळतांना दिसले.

स्टारबक हे सांगण्यासाठी अहाबच्या केबिनकडे धावला.

“सर, साठवलेले तेल गळते आहे. आपल्याला पिपे काढून कुठून गळत आहेत, ते बघावे लागेल.”

त्याच्या तक्त्यांचा अभ्यास करणारा अहाब चिडून गोलाकार फिरला. त्याने फटकारले, “आपण जपानच्या खूप जवळ आहोत. जुनी पिपे दुरुस्त करण्यात वेळ फुकट जाईल. तसे करायला नको.”

स्टारबक वाद घालत बोलला, “पण सर, जेवढे तेल आपण एका वर्षात परत भरू शकू, इतके तेल एका दिवसात फुकट जाईल. आपण एवढे बावीसशे मैल आलो आहोत, तर तेल वाचवणे क्रमप्राप्त आहे.”

अहाब म्हणाला, “आपण जे मिळवण्यासाठी आलो ते, मिळाले असेल, तर तुझे म्हणणे बरोबर आहे.”

स्टारबक थंडपणे बोलला, “सर, मी पिपात साठवलेल्या तेलाबद्दल बोलतो आहे.”

अहाब ओरडला, “आणि मी त्याबद्दल बोलत नाही आहे! ते गळू दे. स्टारबक, तू आता जा.”

“सर, पण मालक काय म्हणतील?”

“त्याना नान्टुकेटच्या किनाऱ्यावर उभे राहून, वादळात ते धमाकेदारपणे विकू दे. अहाब काही पर्वा करत नाही. कुठल्याही गोष्टीचा खरा मालक त्याचा कमांडर [अधिकारी] असतो आणि पिक्वॉडचा कमांडर अहाब आहे. आता डेकवर जा!”

स्टारबकने चालू ठेवले. “पण कप्तान --- “

अहाबने मांडणीतून एक भरलेली बंदुक काढली आणि ती त्या मुख्य अधिकाऱ्यावर रोखली. “या पृथ्वीचा राजा एक देव आहे आणि पिक्वॉडचा राजा अहाब आहे. डेकवर जा!”

स्टारबकचे डोळे चमकत होते आणि गाल लालभडक झाले होते. त्याने कसेबसे स्वतःला शांत केले. तो केबिनबाहेर गेल्यावर, वळून बोलला, “तू माझा फक्त अपमान केला नाहीस, तर मला फार चिरडीला आणले आहेस. मी तुला स्टारबकपासून धोका असल्याची ताकीद देणार नाही. तू त्यावर नुसता हसशील. पण सर, अहाबला अहाबचीच भीती असू दे --- तूच तुझा सर्वात वाईट शत्रू असशील!” स्टारबक गेल्यावर अहाबने विचारपूर्वक त्याने ऐकलेले सर्व आठवले. “अहाबला अहाबचीच भीती असू दे” यात काही अर्थ आहे.”

शेवटी अहाबने स्टारबकचे ऐकायचे का ठरवले, हे सांगणे अवघड आहे. ती प्रामाणिकपणाची झलक असेल किंवा तो आणि त्याचे ऑफिसर्स यांच्यात चांगले संबंध ठेवणे सुरक्षिततेचे असेल. काही असो, त्याने व्हेलच्या तेलाची पिपे उचलून तपासायची आज्ञा दिली. ओलसर, घसरड्या व तेलकट पिपांबरोबर काम करून, बिचाऱ्या क्विक्वेगला थंडी वाजून, सडकून ताप

भरला. अशक्त व दुर्बळ असा तो लांबवर त्याच्या दोरीच्या झुल्यावर पडून राहिला व त्याची तब्येत अधिकच खालावत गेली. त्याची आकृती व अंगावरील गोंदण राहिले, तर तो जेमतेम दृष्टीस पडेल, एवढाच उरला. तो जवळजवळ मृत्युपंथालाच लागला.

एक दिवस त्याने विचित्र मागणी केली. तो म्हणाला, नान्टुकेटमध्ये त्याने काही विशिष्ट गडद लाकडाची अरुंद, हलकी, कडेला खूप निमुळती असलेली व झाकण असलेली, त्याच्या जन्मगावातल्यासारखी पायबोट पाहीली होती. त्याने असे ऐकले होते, की नान्टुकेटमध्ये मरणाऱ्या, व्हेल्सची शिकार करणाऱ्या बोटींवरील सर्व माणसांना त्या पायबोटीत पुरले जाते. की कल्पना त्याला आवडली. ही त्याच्या पूर्वजांच्या चालीरीतीशी मिळतीजुळती होती, की लढवय्याला त्यात ठेऊन चांदण्यांनी भरलेल्या आकाशाखालील पाण्यात तरंगत सोडून द्यायचे.

जेव्हा जहाजाच्या सुताराला या इच्छेबद्दल सांगितले गेले, तेव्हा तो सरळ क्विक्वेगकडे गेला आणि काळजीपूर्वक त्याची मापे घेतली. आधीच्या सहलीत बेटांवरील झाडाचे कापलेले काळसर लाकूड पिक्वॉडमध्ये साठवलेले होते. त्याने कॉफिन बनवायला सुरवात केली.

जेव्हा ते तयार झाले, तेव्हा क्विक्वेगने त्याचे हार्पून मागवले आणि त्याच्या बोटीच्या वल्ह्याबरोबर ते कॉफिनमध्ये ठेवले. याशिवाय त्याने ताज्या पाण्याचे एक भांडे, एक लाकडी पेटी व उशीला गुंडाळलेले एक शिडाचे कापड मागवले. जेव्हा ही तयारी पूर्ण झाली, तेव्हा त्याने हाताची घडी घालून व त्याचा

देव योजो छातीवर ठेऊन, त्याच्या शेवटच्या अंथरुणात शिरून बघितले. मग त्याने त्याला परत त्याच्या झुल्यावर ठेवायला सांगितले.


पण अशी सगळी मरणाची तयारी करून व मनासारखे कॉफिन मिळवून, एकदम त्याचे मन बदलल्यासारखे, अचानक त्याला बरे वाटू लागले.

आता त्याने ते कॉफिन त्याचे कपडे ठेवण्यासाठी वापरायला सुरवात केली. त्याच्या झाकणावर अनेक विचित्र आकृत्या कोरुन चित्रे काढण्यात त्याने तासनतास घालवले. त्यातील बहुतेक चित्रे त्याने त्याच्या शरीरावरील गोंदणातून घेतली होती.

स्वर्ग व पृथ्वीबद्दल पूर्ण स्पष्टीकरण देणाऱ्या धर्मगुरूने त्याच्या शरीरावर ते गोंदण उमटवले होते. तर अशा तऱ्हेने क्विक्वेग म्हणजे एक चालतेबोलते कोडे होता ---एक प्रकारची गूढ गोष्ट होता.

# प्रकरण १४

## विचित्र भाकीत



A Harpoon Tempered in Blood!

पिक्वॉडमध्ये एक पर्थ नावाचा म्हातारा लोहार होता. अहाब त्याच्याकडे एका विशेष कामासाठी गेला. कप्तानाने शर्यतीत धावणाऱ्या घोड्यांच्या लोखंडी खुरांच्या वाकड्या, जाड नखांची पुरचुंडी त्या लोहाराकडे आणली व ती वितळवून, त्याचे खूप बळकट असे हार्पून बनवायला सांगितले.

जेव्हा पर्थ त्याच्या धारदार टोकाला आगीत भाजून तप्त करत होता, तेव्हा त्याने अहाबला पाण्याचे भांडे आणायला सांगितले. गार पाण्याने ते टोक अजून कडक व धारदार झाले असते. पण अहाबची कल्पना वेगळी होती.

तो म्हणाला, ‘‘नाही, मी त्यासाठी पाणी वापरणार नाही. मला त्या हार्पूनचे टोक म्हणजे खरोखर मरणाचे शस्त्र व्हायला हवे आहे. ते रक्तात भिजवले पाहिजे. मग तीन इंडियन्सकडे वळून त्याने विचारले, ‘‘टॅष्टेगो, डॅगो आणि क्विक्वेग, तुम्ही मला यासाठी लागणारे रक्त द्याल का?

ते तिघे तयार झाले. मग त्या तिघाच्या हाताला तीन लहान भोके पाडली गेली आणि लवकरच रक्तात भिजून धारदार झालेले, पांढऱ्या व्हेलला ठार करायचे शस्त्र तयार झाले.

त्या रात्री उशीरा अहाब एक स्वप्न पडून जागा झाला. डेकवर जिथे फेडल्लाह पहारा देत होता, तिथे जाऊन त्याने स्वतःच्या स्वप्नाबद्दल सांगितले. त्याने त्यात स्वतःची प्रेतयात्रा बघितली.

कंदिलाच्या फडफडणाऱ्या ज्योतीच्या उजेडात फेडल्लाहने त्याच्याकडे डोकावून पाहीले. ‘‘माझ्या दूरदृष्टीने मी तुला तुझ्या मरणाविषयी सांगितले आहे. तुला ते आठवत नाही का? मी सांगितले, की तुला कॉफिन लागणार नाही व तुझी प्रेतयात्राही निघणार नाही.’’

‘‘पण तरी मी काळजी करतो. समुद्रात मरण येणाऱ्यांची प्रेतयात्रा निघत नाही.’’

“मी हे पण म्हटले नाही का, की या सफरीत तू मरण्यापूर्वी, तुला येथील दोन प्रेतयात्रा बघाव्या लागतील?” फेडल्लाहने त्याला आठवण केली. “त्यातील पहीले मरण मनुष्याच्या हातून होणार नाही आणि दुसरे मरण अमेरिकेत वाढलेल्या लाकडाने होईल.”

अहाब बोलला, “सागरात ते फार विचित्र दिसेल. पण दुसरा तुझ्याबद्दल काय बोलत होता?”

“की मी तुझ्या आधी जाईन. दुसऱ्या जगात मी तुझी वाट सुकर करून ठेवेन.”

“फेडल्लाह, तू मेल्यावर, तू पुन्हा माझ्यासमोर येऊन मला मार्गदर्शन करशील, खरे ना? मला वाटते, याचा अर्थ मी मॉबी डिकला मारू शकेन आणि ती गोष्ट सांगण्यासाठी जिवंत राहेन.”

तो इंडियन गूढपणे बोलला, “अरे म्हाताऱ्या, अजून एक वचन घे. फक्त दोरी तुझा मृत्यू घडवून आणेल.”

अहाब फसवेपणे हसत बोलला, “म्हणजे तुला गळफास, असे म्हणायचे आहे का? पण तसे कधीच होणार नाही. त्यामुळे मी कायम जिवंतच रहाणार.”

जसे आम्ही विषुववृत्ताजवळ आलो --- कारण तिथे अहाबला मॉबी डिक सापडेल, असे वाटत होते, पण आम्हाला वेगळेच --- जोरजोराने वरच्या पट्टीतील जणू भुताचे रडणे, ऐकू आले. ते जवळील खडकाळ बेटावरून ऐकू येत होते. जहाजावरील सुशिक्षित सुसंस्कृत ताफा बोलला, की त्या जलपऱ्या आहेत आणि माणसे शहारली. पागन हार्पूनर्स शांत राहीले. पण इंग्लंडपासून

लांब असलेल्या निमुळत्या टोकाच्या बेटावरील रहिवासी असलेल्या जहाजावरील, खलाशाने त्याचा हात वर केला. सर्वात म्हाताऱ्या खलाशाचे मत वेगळे होते. त्याच्या मते ते आवाज समुद्रात नव्याने बुडलेल्या माणसांचे होते. नंतर जेव्हा फ्लास्कने अहाबला या विचित्र, घाबरवणाऱ्या आवाजाबद्दल सांगितले, तेव्हा अहाब हसला. तो म्हणाला, "मला असल्या बेटांबद्दल सगळे काही माहिती आहे. हे पिल्ले मरण पावलेल्या सील माशांमधील आईचे व आई मेलेल्या पिल्लांचे रडणे आहे. या स्पष्टीकरणाने, ताफ्याला फक्त अजून वाईट वाटले. बरेचसे खलाशी सील माशांबद्दल अंधश्रद्धा बाळगून होते. प्राण्यांचे त्रासदायक आवाज माणसासारखे वाटतात पण त्यांच्या गोल डोक्यामुळे व अर्धवट बुद्धिमान चेहऱ्यांमुळे, ते मानवी डोके व चेहऱ्याशी साम्य असलेले वाटतात. त्यामुळे हा अपशकून मानला गेला. माणसे काहीतरी वाईट होण्याची अपेक्षा करू लागले.

नक्कीच खूप वाईट झाले --- पांढरा व्हेल दिसतो का, हे बघण्यासाठी मुख्य शिडावर चढलेल्या खलाशाचे वाईट झाले. अर्धवट झोपेत असलेला तो समुद्रात पडला. लगेच त्याला धरण्यासाठी लाकडी ओंडका पाण्यात टाकला गेला पण तो फार वेळ उन्हात असल्याने, सुकून आटला. त्यात पाणी शिरले आणि त्याचे वजन वाढल्याने, तो बिचाऱ्या खलाशाबरोबर पाण्यात खाली गेला.

लोकांना वाटले आता सील माशांचा रडका अपशकून संपला, पण त्या म्हाताऱ्या खलाशाला तसे वाटत नव्हते.

आम्हाला भविष्यात उपयोग करण्यासाठी ओंडका बदलणे गरजेचे होते. पण आम्हाला हलकेसे पीप शोधायला त्रास होत होता. क्विक्वेगने त्याच्या कॉफिनकडे बोट दाखवले. त्याचे चांगले, कडक लाकूड तेल काढून ठेवायला योग्य होते. पहील्यांदा ही कल्पना ऑफिसर्सना विचित्र वाटली, पण नंतर त्यांनी सुताराला कॉफिनचे झाकण घट्ट करायला सांगितले व आत पाणी जाऊ नये म्हणून सीलही करायला सांगितले. आता पिक्वॉडचा जीवरक्षक ओंडका म्हणजे, कॉफिन होते.

दुसऱ्या दिवशी, राचेल नावाचे मोठे जहाज आमच्या जवळ येऊ लागले. ते माणसांनी खचाखच भरलेले होते. अहाबचा आवाज आला, “तुम्ही पांढरा व्हेल पाहीला का?”

राचेलकडून आवाज आला, “हो, कालच. तुम्ही व्हेलबोट तिथे थांबलेली पाहीली का?”

मॉबी डिक दिसल्याच्या आनंदात, अहाबने काही उत्तर दिले नाही आणि अजून माहिती मिळण्यासाठी त्याला राचेलवर चढण्यात रुची होती. पण राचेलच्या कप्तानाने झटपट आमच्या जहाजात प्रवेश केला. त्याने अहाबच्या प्रश्नाला सविस्तर उत्तर दिले.

“आमच्या चार पाच बोटी त्या व्हेलच्या उंचवट्याच्या मागे गेल्या आणि त्यातील सर्वात जलद बोटीने त्या महाकाय माशाला बांधल्यासारखे वाटले. अचानक बोट आणि व्हेल दोन्ही नाहीसे झाले. आम्ही अंदाज केला की

जखमी व्हेल त्याच्या शिकाऱ्यांना घेऊन पळाला असावा. पण जरी आम्ही रात्रभर शोधले, तरी हरवलेल्या बोटीचा काही मागमूस लागला नाही.”

अहाब नाराज झालेला वाटला. पण त्या कप्तानाचे सुरूच होते. “मी इथे तुम्हाला हे विचारण्यासाठी आलो आहे, की तुम्ही आमच्या शोधमोहिमेत आम्हाला सहकार्य द्याल का? आपण समांतर मार्गाने माझ्या माणसांना शोधत, तो भाग कापत राहू आणि --- “ क्षणभर हो नाही करत तो पुढे बोलला, “माझा स्वतःचा मुलगा त्यात आहे.”

इथे राचेलच्या कप्तानाला अहाबचा थंडपणा दिसला. तो ओरडला, “कृपया, मी तुम्हाला विनवणी करतो. मला तुमचे जहाज भाड्याने घेऊ दे. मी आनंदाने पैसे मोजेन.”

स्टब बोलला, “आपण त्या मुलाला वाचवायला पाहीजे.”

माझी खात्री होती, की स्टब हे बोटीवरील सर्वांच्या वतीने बोलला. मग लोकांच्या पसंतीच्या आरोळ्यांनी ते सिद्ध केले.

त्याच क्षणी म्हाताऱ्या खलाशाने हात वर करून सर्वांना गप्प रहाण्याविषयी सुचवले. तो म्हणाला, “इतराबरोबर तो मुलगा काल रात्रीच बुडाला. आपण आत्म्यांचा आवाज ऐकला नाही का?”

अहाबने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. पण कप्तानाकडे वळून तो शांतपणे बोलला, “मी असे करणार नाही. आमचा वेळ फुकट चालला आहे. अच्छा आणि देव तुम्हाला मदत करो.”

राचेलचा कप्तान क्षणभर दिग्मूढ झाला.

मग अहाब त्याच्या पहील्या ऑफिसरकडे वळला आणि त्याला हाक मारली. “मिस्टर स्टारबक, तीन मिनिटाच्या वेळात आपल्या बोटीवरचे हे सर्व वेगळे लोक गेले पाहीजेत आणि जहाज पूर्वीसारखे चालू ठेवा.”

# प्रकरण १५

## पहील्या दिवसाचा पाठलाग



Captain Ahab's Family

नंतर काही दिवसांनी आम्हाला चुकीच्या नावाचे आनंद हे जहाज लागले. अहाबच्या त्याच जळत्या प्रश्नाला आनंदच्या कप्तानाने तुटक्या व्हेलबोटीकडे निर्देश केला. अहाबने विचारले, “तुम्ही त्याला ठार केले का?”

आनंदच्या कप्तानाने उत्तर दिले त्याला ठार करायचे हार्पून अजून तयार व्हायचे आहे. त्याचे नवीन बनवलेले हार्पून उंच करत अहाब बोलला, “त्याचे मरण इथे आहे!”

आनंदच्या कप्तानाने म्हटले, “मग देव तुम्हाला मदत करो. त्या शापित पांढऱ्या व्हेलपायी मी माझी पाच चांगली माणसे गमावली. तुम्ही त्यांच्या कबरीवर बोट चालवत आहात!”

पूर्वी स्टारबकने खूप वेळा म्हाताऱ्या अहाबला त्या द्वेष करण्यायोग्य पांढऱ्या व्हेलचा वेडा पाठलाग करणे सोडून देण्याविषयी सांगितले होते. आता पुन्हा त्याने अहाबला परत फिरण्याविषयी आग्रह केला. “आपल्याकडील सर्व ताफ्याला सुरक्षितपणे त्यांच्या बायको व मुलाबाळांकडे परत का पाठवू नये?”

क्षणभर अहाब मऊ झाल्यासारखा वाटला. तो त्याच्या बायको व मुलाविषयी तरसत असल्यासारखे बोलला, “आता माझा मुलगा चालतो. अंथरुणात उठून बसतो. त्याची आई त्याला माझ्याविषयी सांगत असते, मी कसा समुद्रावर आहे, पण मी त्याच्याबरोबर खेळण्यासाठी कसा परतणार आहे.” अहाब थांबला. मग पुढे बोलला, “पण माझ्या आत एक राक्षस आहे. मी काय करायला नको, ते करण्यासाठी तो मला सतत ढोसत असतो. नाही, स्टारबक, त्या पापी मॉबी डिकला मारल्याशिवाय माझे समाधान होणार नाही!”

दिवस उजाडला तेव्हा अहाबने समुद्राची हवा श्वासात भरून घेत जाहीर केले, “व्हेल जवळ आहे.” लवकरच सगळ्यांना स्पर्म व्हेल सोडतो, तो विशिष्ट वास आला आणि अहाबने जहाजाचा मार्ग भरभर बदलला.

अहाब ओरडला, “मी त्या व्हेलला प्रथम बघणार. त्याला पहिल्यांदा बघितल्याबद्दल मला सोन्याचे स्पॅनिश नाणे मिळायला हवे. फक्त अहाबला!” आणि त्याने पूर्वीच लावलेल्या नाण्याकडे निर्देश केला.

अहाबने त्याच्यासाठी दोरीचे टोपले तयार केले. त्यात तो बसला व दोन माणसांनी त्याला समुद्राचे पूर्ण दृष्य टिपण्यासाठी मुख्य शिडावर चढवले. जेव्हा तो खूप उंच दोन तृतीयांश अंतर चढला, तेव्हा त्याने समुद्रगलसारखी किंकाळी मारली, “तिथे तो पोहतो आहे. त्याच्या शरीरावरील उंचवटा बर्फाच्या डोंगरासारखा दिसतो आहे. तो मॉबी डिक आहे!”

इतक्या वेळानंतर दिसलेल्या त्या प्रसिद्ध व्हेलसाठी डेकवरील लोकांनी भरभर तयारी सुरु केली. तिथे मॉबी डिक होता --- एखादा मैल किंवा त्याहून पुढे. समुद्राचा कुठलाही भाग त्याचा चमचमणारा उंचवटा आणि हवेतील शांत कल्ले दाखवत होता.

शिडांना बांधलेल्या दोऱ्यांशी जमलेल्या माणसांना अहाब ओरडून म्हणाला, “तुमच्यापैकी कोणीच त्याला यापूर्वी पाहीलेले नाही का?”

टॅष्टेगो किंचाळला, “मी त्याला त्याच क्षणी पाहीले व ओरडलोदेखील.”

अहाब बोलला, “तरीही, त्याच क्षणी नाही. सोन्याचे स्पॅनिश नाणे माझे आहे. नशीबाने ते माझ्यासाठी ठेवले आहे --- फक्त माझ्याचसाठी! फक्त मीच मॉबी डिकला सापडवू शकतो!”

उद्दीपित होऊन, अहाब आज्ञा सोडू लागला. “उभे रहा, उभे रहा! मिस्टर स्टारबक, माझी बोट लवकर खाली करा. लवकर! आणि इतर बोटीही तयार

करा.” असे बोलून तो जणू हवेतून घरंगळत डेकवर आला. लवकरच स्टारबकची सोडून इतर बोटी खाली केल्या गेल्या व त्यांनी मॉबी डीकचा पाठलाग सुरु केला. अहाबने मॉबी डिकच्या डोक्यावरील सुरकुत्या फक्त पाहील्या. पांढऱ्या व्हेलचे डोके व त्याच्या बाजूला नाचणारे, चमकणारे बुडबुडे! त्या पांढऱ्या व्हेलच्या पाठीत अजूनही तुटका भाला दिसत होता. पण त्याच्या जबड्याचा भयंकरपणा पाण्यात लपल्यामुळे, तो इतका शांत आणि स्तब्ध भासत होता. पाण्याची मोठी फेसाळ कमान करत, व्हेल अचानक हळूहळू पाण्याच्या वर आला. मग त्याने जवळजवळ सूचना दिल्यासारखी, शेपटीची हालचाल केली आणि त्याने पाण्याच्या पृष्ठभागावर तयार केलेल्या गोल कड्यामध्ये बुडून गेला.

मॉबी डिक परतण्याची वाट बघत, तीन बोटी शांत पाण्यावर तरंगत होत्या. अहाबने त्या राक्षसी व्हेलपासून दूर त्याच्या बोटीच्या कडेने अथांग समुद्रात डोकावून पाहीले. यामुळे मॉबी डीकच्या डोक्यामधील चेहऱ्याभोवती दोरीचा बो बांधला गेला. पण व्हेलच्या आश्चर्यकारक रीत्या पापी, राक्षसी बुद्धिमत्तेने त्या बेतावर पाणी फिरवले तो लबाडीने पाण्याखाली गेला आणि त्याच्या डोक्याच्या धक्क्याने बोट जोराने ढकलली गेली.

त्याचा लांब, अरुंद जबडा उघडला. आता दोरीची सुरगाठ त्याच्या तोंडात होती आणि त्याचा एक दात वल्हे अडकवणाऱ्या बोटीच्या हुकात अडकला गेला होता. त्याच्या जबड्याच्या आतील निळा-पांढरा भाग

अहाबच्या डोक्यापासून सहा इंचांच्या आत होता. मांजराने उंदराला खेळवावे, तसे मॉबी डिक हळूहळू बोट हलवू लागला.

फेडल्लाह हाताची घडी घालून, न घाबरता, स्तब्ध बसला होता. तर ताफ्यातील बाकीचे लोक गंभीरपणे व्हेलच्या जबड्यापासून लांब जाण्याचा प्रयत्न करत एकमेकांवर आदळत होते.

अहाब अनावर उद्दीपित अवस्थेत, त्याच्या शत्रूला पकडण्यासाठी त्याच्या इतक्या जवळ होता. पण आता विवश होऊन, त्याच्या जबड्याच्या हाडात रिकाम्या हातांनी अडकला गेला. बोटीपासूनच्या दोराला एक झटका देऊन अहाबने स्वतःला सोडवण्याचा प्रयत्न केला पण जबडा घसरत बोटीपर्यंत आला व मोठ्या कात्रीप्रमाणे त्याने बोटीचे दोन तुकडे केले.

मॉबी डिक जणू भयानक हल्ला केल्याप्रमाणे पाणी घुसळत रागाने गोल फिरला आणि बोटीवरील सर्व माणसे पाण्यात फेकली गेली.

इतर बोटी हवेत उडवल्या गेल्या पण काही नुकसान न होता तशाच राहील्या, पण पुन्हा व्हेल हल्ला करेल, या भीतीने त्या अहाबला किंवा ताफ्यातील इतर लोकांना मदत करू धजल्या नाहीत.

नशीबाने पिक्वॉड व्हेल आणि पोहणारे लोक यांच्यामध्ये तरंगत होते. मॉबी डिक बेफामपणे पोहत दुसरीकडे गेला व इतर बोटीतील लोक पोहणाऱ्या लोकांच्या मदतीला धावले.

उसळणाऱ्या समुद्राच्या लाटांमुळे, अर्धवट आंधळा झालेल्या अहाबला स्टबच्या बोटीत ओढले गेले. तो रडत भेकत कसाबसा उभा राहीला.

“मला हात लाऊ नका. परत माझ्या धमन्यांमधून रक्त वाहते आहे. शीड उभारा. माणसांनो वल्हवा. बोट व्हेलच्या मागे न्या!”

नुकतीच सुटका झालेल्या ताफ्याने जोरजोरात वल्हवायला सुरवात केली तरी, व्हेलच्या वेगाशी ती स्पर्धा करू शकत नव्हती. मॉबी डिक वेगाने दूर गेला.

जेव्हा परत सगळे पिक्वॉडवर चढले, तेव्हा अहाब परत त्या सोन्याच्या स्पॅनिश नाण्याबद्दल बोलू लागला. तो म्हणाला, “ते सोने माझे आहे. मी ते मिळवले आहे.”


पण पांढरा व्हेल मरेपर्यंत, मी ते तिथेच ठेवेन. तो मारला जाईल त्या दिवशी जो त्याला प्रथम बघेल, त्या माणसाला ते मिळेल. आणि मलाच तो दिसला, तर त्याच्या किंमतीच्या दहापट तुम्हा सर्वजणात सारखी वाटली जाईल! आता बाजूला व्हा.”

असे म्हणून त्याने डेकवरील कापलेल्या भोकातील त्याची जागा घेतली आणि झोपत व स्वतःला उठवत, पहाटेपर्यंत तिथे उभा राहीला.

अशा तऱ्हेने मॉबी डिकच्या पाठलागाचा पहीला दिवस संपला.

## प्रकरण १६

## दुसऱ्या दिवसाचा पाठलाग


Ahab's Ivory Leg Has Been Snapped Off.

दुसऱ्या दिवशी मुख्य शिडावरुन परत आरडाओरडा ऐकू आला. "तो तिथे आहे ---तिथे आहे! अगदी समोर!"

स्टब ओरडला, "ओय, ओय! मला ते माहिती आहे. आता तो निसटू शकत नाही. वल्हवत रहा आणि स्वतःचा खालचा ओठ पुढे काढून, 'अरे पांढऱ्या माशा' असे ओरडा. तो राक्षसच तुमच्या मागे येईल! जसा कारखानदार झऱ्यावरील दार बंद करून ठेवतो, तसे अहाब तुमचे रक्त रोकून ठेवेल."

सर्व ताफा त्या पाठलागाने उद्दीपित झाला. त्याना आधी वाटणारी भीती वा शंकाकुशंका अहाबच्या चेतवणाऱ्या भाषणाने फिटल्या. तीस माणसे एकजुटीने म्हाताऱ्या कप्तानाच्या मरणप्राय उद्दिष्टाकडे वाटचाल करू लागले.

अहाब उंच शिडावर चढला नाही तोच, डेकवरील तीस माणसे बेंबीच्या देठापासून विजयाच्या आरोळया मारू लागली. एका मैलाच्या आत मॉबी डिक दृष्टीपथात आला. शांत, आळशीपणे हालचाल करत नव्हे, तर वेगाने पाण्यावर उसळी घेत --- त्याचे सर्व शरीर घुसळवत व पाण्याबाहेर उंच झेपावत, त्याची मग्रुरी व विरोध दाखवत तो आला.

अहाब किंचाळला, "मॉबी डिक, तुझे शेवटचे सूर्यदर्शन करून घे. आता तुझी वेळ भरली आहे! माझे हार्पून तयार आहे. बोटींनो, तयार रहा."

अहाब उंच शीडावरुन डेकवर उतरला. त्याच्या बोटीशी गेल्याबरोबर, तो बोलला, "खाली करा.

हल्ला करणारा पहीला म्हणून त्यांच्यात भीती जागवत, मॉबी डिक वळून, त्या तीन बोटींच्या दिशेने सरळ झेपावला.

यावेळेस अहाब सरळ पांढऱ्या व्हेलच्या कपाळाच्या दिशेने निघाला, कारण त्या प्राण्याला समोरच्यापेक्षा बाजूने जास्त चांगले दिसत असे. पण ते त्याच्याजवळ पोचण्यापूर्वीच आणि अजून तीन बोटी व्हेलच्या दृष्टीपथात असतानाच, मॉबी डिक भलत्याच वेगाने जबडा उघडा ठेऊन, शेपटी नाचवत, बोटींमध्ये घुसला. प्रत्येक बोटीतून त्याच्यात घुसू बघणाऱ्या हार्पून्सकडे दुर्लक्ष करत, शरीर घुसळवत, परत परत त्यांच्यातील सीमारेषा ओलांडत राहीला.

त्या रेषांच्या जाळयात, हार्पून्समध्ये व लाकडी भाल्यांमध्ये वळवळत, मॉबी डिक अहाबच्या बोटीच्या टोकाच्या गोलाकाराशी आला. त्या म्हाताऱ्याला करण्यासारखी एकच गोष्ट होती, ती म्हणजे त्याची दोरी सैल सोडणे. पण त्याने असे केल्यावर, पांढऱ्या व्हेलने इतर रेषांच्या गुंत्यात उडी मारली. त्याने स्टब आणि फ्लास्कच्या बोटी त्याच्याकडे ओढल्या गेल्या व एकमेकांवर आपटल्या. मग त्या रौद्र लाटांमुळे उलट्या झाल्या. मग व्हेल पाण्याखाली गेला व पाण्याच्या उसळत्या भोवऱ्यात दिसेनासा झाला.

खलाशांचे दोन ताफे निरुपायाने व घाईघाईने, पाण्यात गोलाकार फिरत बसले. फ्लास्क पाय वर केलेल्या अवस्थेत व्हेलच्या जबड्यातून सुटका होण्यासाठी, रिकाम्या बाटलीप्रमाणे पाण्यात वरखाली होत राहीला. स्टब त्याला वर येण्यासाठी प्रयत्न करण्यास सांगत राहीला.

त्याची बोट समुद्रातून अचानक उडाली, तेव्हा अहाब तेथील लोकांना शक्य झाल्यास वाचवण्यासाठी, भोवऱ्यात शिरणार होता. अदृष्य तारांनी आकाशात खेचल्यासारखी, ती उडाली. मॉबी डिकने त्याचे रुंद कपाळ अहाबच्या बोटीच्या तळाला धडकवले. त्यामुळे ती बोट हवेत कोलांट्यावर कोलांट्या घेऊ लागली. शेवटी ती उलटी पडली. त्याखालून अहाब व बोटीतील इतर माणसे जीव वाचवण्यासाठी झगडू लागली.

लवकरच त्याच्या कामगिरीने तात्पुरते समाधान पावत, व्हेलने त्याच्यामागे पाण्यात एकमेकात मिसळलेल्या रेषा सोडत, त्याचे कपाळ समुद्रात ढकलले.

पूर्वीसारखेच, पाण्यावर तरंगणाऱ्या खलाशांच्या सुटकेसाठी, त्यांच्या वल्ह्यांसाठी व हार्पून्ससाठी, पिक्वॉडने एक बोट खाली सोडली. त्याच्या अर्धवट तुटलेल्या बोटीच्या फळकुटांना चिकटून पोहणाऱ्या अहाबला तिने उचलून घेतले. नशीबाने तिथे काही अपघात वा मृत्यू झाले नाहीत. फक्त वाईट जखमा, दुखावलेले खांदे, मनगटे आणि टाचेवरील भाग यावर निभावले.

पिक्वॉडच्या डेकवर परत आल्यावर, अहाब अर्धवट स्टारबकच्या खांद्यावर रेललेला दिसत होता. त्याचा हस्तिदंती रंगाचा पाय तोडला गेला होता. फक्त लहानसा टोकेरी लाकडाचा तुकडा तिथे उरला होता.

तो ओरडला, “म्हातारा अहाब अस्पर्श राहीला! हाड देखील तुटले नाही. मला काठीऐवजी येथील भाला द्या व मग खलाशांना गोळा करा.”

जेव्हा त्याच्यासमोर ताफा जमा झाला, अहाबने एका माणसाचा चेहरा शोधला ---. फेडल्लाहचा. पण तो बळकट मनुष्य कुठे दिसत नव्हता! स्टब बोलला, “अरेरे! सर, तुमच्या बोटींच्या रेषांमध्ये तो अडकला गेला होता. मला वाटते, मी त्याला खाली ओढला जातांना पाहीले.”

अहाब ओरडला, “माझ्या बोटींच्या रेषांमध्ये? माझ्या बोटींच्या रेषांमध्ये? गेला? हा मरणाचा अपशकुन आहे. माझ्या मरणाचा! आता झटपट सर्व भाले गोळा करा. जर मला या पृथ्वीभोवती दहा वेळा जावे लागले, तरी किंवा जरी सरळ पाण्यात सूर मारावा लागला, तरीही मी मॉबी डिकला ठार करेन!”

स्टारबक किंचाळला, “परमेश्वरा, म्हाताऱ्या, तू त्याला कधीच पकडू शकणार नाहीस. आता हे बास झाले. दोन दिवस तू त्याचा पाठलाग करतो आहेस आणि दोन दिवस आपल्या बोटींचे तुकडेतुकडे झाले आहेत. तुझा कृत्रिम पायही तुझ्यापासून तोडला गेला. तुला आतापर्यंत खूप वेळा ताकीद मिळाली आहे. आपल्यापैकी प्रत्येकाला सागराचा तळ दाखवेपर्यंत, या सैराट खुनी व्हेलचा पाठलाग आपण चालू ठेवणे खरेच जरुरीचे आहे का?”

अहाब ओरडला, “हा समुद्र अस्तित्वात येण्यापूर्वी कोटी कोटी वर्षे हा प्रसंग घडणार असल्याचे ठरले होते. माझ्या बांधवांनो, हसा. असे म्हटले जाते, की बुडणाऱ्या गोष्टी दोनदा पृष्ठभागावर येतात व मग वर येऊन, कायमसाठी खाली जातात. असेच मॉबी डीकचे होणार. दोन दिवस तो तरंगला. उद्या तिसरा दिवस असेल --- तो अजून एकदा तरेल --- पण ते शेवटचेच असेल!”

मग स्वतःशीच अहाब पुटपुटला, “फेडल्लाहचे भाकीत होते, की तो माझ्यापूर्वी मरेल. पण तो म्हणला होता, की मी मरण्यापूर्वी एकदा त्याला बघेन आता माझ्या मेंदूला हे कोडे सतावत बसणार, पण मी ते सोडवेन.”

# प्रकरण १७

## विचित्र भाकीत खरे ठरते



"To the Last I Shall Fight Thee!"

तिसऱ्या दिवशीची पहाट चांगली उजाडली. परत एकदा शिडावरील एकाकी रात्रीपासून, दिवसाउजेडाच्या कोलाहलाने सुटका केली. दिवसाचा उजेड प्रत्येक शीडावर ठिपक्याठिपक्याने पडला.

हस्तिदंती रंगाच्या तोडल्या गेलेल्या पायाऐवजी, झटपट बनवलेल्या लाकडी पायाने, अहाब पुन्हा त्याच्या दोरीच्या टोपल्याच्या सहाय्याने मोठ्या शिडावर चढला. सुमारे तासभर सागर निरीक्षण केल्यावर, त्याला व्हेल दिसल्यासारखे वाटले. मोठ्या शिडापासून, "तिथे तो आहे." अशा तीन आरोळ्या उठल्या.

अहाब बोलला, “मॉबी डिकला मी समोरासमोर तिसऱ्यांदा भेटतो आहे. मग प्रेमाने तो शिडाला बोलला, “शिडा, मी तुझा निरोप घेतो. मी खाली चाललो आहे. मी इथे नसतांना त्या पांढऱ्या व्हेलवर चांगले लक्ष ठेव. आपण उद्या बोलू. आज रात्री नव्हे. तेव्हा पांढरा व्हेल पूर्णपणे बांधला जाऊन, जहाजाशेजारी पडलेला असेल.”

जशी अहाबची बोट खाली केली गेली, त्याच्या डोक्यातील कोड्याने परत डोके वर काढले. तो स्वतःशीच कुजबुजला, “पण फेडल्लाह काय म्हणाला होता? तो माझ्याआधी मरेल. तरीही तो मला परत दिसेल. पण कुठे? तो बुडाला तिथून मी खूप दूर आलो आहे. नाही, फेडल्लाह तू तुझ्याविषयीच्या भाकीताविषयी खरा असू शकशील. पण आहाबच्या बाबतीत तू खोटा ठरला आहेस!”

जसे अहाबने बोटीत उतरायची तयारी केली, तसे तो स्टारबककडे वळला. “माझ्याबरोबर हातमिळवणी कर. मी म्हातारा आहे, फार म्हातारा आहे.”

त्याचे डोळे अश्रुनी भरले. स्टारबकने युक्तिवाद केला, “अरे माझ्या कप्ताना, जाऊ नकोस. माझ्यासारखा शूर माणूस दुःखाने तुझी विनवणी करतो आहे.”

अहाब त्याच्या मित्राचा हात बाजूला करत ओरडला, “बाजूला हो.” बोटी खाली केल्या गेल्या. पण त्या फार लांब गेल्या नव्हत्या, तेव्हा मोठ्या शीडाकडून हाताने खाली निर्देश केला गेला. अहाबला समजले की व्हेल खाली गेला होता.

लाटा त्याच्या बोटीच्या दोरीच्या गाठीला धडकू लागल्या. तेव्हा अहाब किंचाळला, “लाटांनो, तुमचा मारा चालू ठेवा. मी काही घाबरत नाही. मॉबी डिक वर येईल, तेव्हा मी तिथे असेन. ओहो, फेडल्लाह, तू चुकत होतास. ‘माझ्यासाठी शवपेटी नसेल व प्रेतयात्राही नसेल.’ लक्षात ठेव. फक्त दोरी माझा मृत्यू घडवून आणेल. हा! हा!

अचानक त्याच्या भोवतालचे पाणी गोल गोल फिरत, मोठ्या वर्तुळात फुगले. खालच्या पट्टीतील स्पष्ट आवाज ऐकू आला. प्रत्येकाने श्वास रोधत, दोऱ्या, हार्पून्स व भाले तयार ठेवले. आणि शेवटी व्हेल पाण्यातून उसळी मारून बाहेर आला.

आदल्या दिवशीच्या त्याच्या अंगात घुसलेल्या भाल्यांनी वेडा होऊन, मॉबी डिक रागाने डोक्याने धडक मारत, त्याची शेपटी बोटींवर हाणत, त्याच्या अंगातून भाले काढायचा प्रयत्न करत व त्यांच्या बोटीच्या दोरीच्या गाठीवर हल्ला करत आला.

व्हेलने वळून जेव्हा पुन्हा धडक मारली, तेव्हा रडक्या आरोळ्या उठल्या. व्हेलच्या पाठीवर मारा करत, गुंतलेल्या दोऱ्यांमध्ये अर्धवट फाटलेले फेडल्लाहचे शरीर होते. त्याचे सताड उघडे डोळे म्हाताऱ्या अहाबवर वटारलेले होते. कप्तानाच्या हातातून हार्पून गळून पडले व त्याने खोल निःश्वास सोडला. तो कुजबुजला, “म्हणजे फेडल्लाह, तू खरे बोलला होतास. मी तुझ्या मरणानंतर तुला परत पाहीले आहे आणि तुझ्या प्रेतयात्रेचे भविष्यदेखील खरे ठरले आहे. अरे, तुझी प्रेतयात्रा माणसाच्या हातून झाली नाही. तुझी प्रेतयात्रा बरोबर झाली

--- पण दुसरी प्रेतयात्रा कुठे आहे? अहाबने त्याच्या विश्रांतीशिवाय असलेल्या ताफ्याकडे पाहीले. तो ओरडला, “खलाशांनो खाली या. या बोटीतून प्रथम उडी मारणाऱ्याच्या बरोबर मी आहे. मी त्याच्या अंगात हार्पून घुसवेन. तुम्ही माझ्यापेक्षा वेगळे नाही. तुम्ही माझे हातपाय आहात आणि त्यामुळे तुम्ही माझी आज्ञा पाळाल. आता तो व्हेल कुठे गेला?”

मॉबी डिक वेगाने बोटींपासून दूर निघून गेला व समुद्रात घुसला. अहाबने वळून, त्याचा मागोवा घ्यायला सुरवात केली. तो नुकताच पिक्वॉड ओलांडत होता, तेव्हा स्टारबक डेकवरून हाका मारत होता.

“ओहो, अहाब, अजून वळून परत येण्याची संधी गेलेली नाही. बघ. मॉबी डिक, तुझ्या मागे नाही. तू वेड्यासारखा त्याच्यामागे आहेस!”

पण अहाबने त्याच्या बोटीला आज्ञा दिली की व्हेलचा पाठलाग चालू ठेवा. वर त्याच्या जहाजाकडे नजर टाकल्यावर त्याला तीन शीडांवर चढणारे टॅष्टेगो, क्विक्वेग व डॅगो दिसले. पिक्वॉडच्या कडेला असणाऱ्या दोन मोडलेल्या बोटींवर काम करणारे, वल्ही मारणारे खलाशी दिसले. तो जोराने जातांना, त्याला जहाजाच्या खिडकीजवळ नवीन भाले आणि दोऱ्याच्या बंडलांवर काम करणारे स्टब आणि फ्लास्क दिसले.

अहाबच्या बोटीच्या वल्ही मारणाऱ्यांना त्रास होत होता. त्याच्या बोटीभोवती शार्क गोळा झाले होते व प्रत्येक वेळी खाली जाऊन वल्ह्यांना चावून तोडत होते.

अहाब किंचाळला, “त्यांच्याकडे काही लक्ष देऊ नका. ते दात तुमच्या वल्ह्यांसाठी फक्त वल्ही अडकवायच्या कड्यांसारखे आहेत. ओढा!”

“पण सर, प्रत्येक चाव्यानंतर वल्ही लहानलहान होत चालली आहेत.”

“तरी ती खूप काळ टिकतील. ओढा. हे शार्क्स व्हेलची किंवा अहाबची मेजवानी करण्याची अपेक्षा करत आहेत का?”

जेव्हा ते पांढऱ्या व्हेलच्या कडेच्या बाजूकडे आले, तेव्हा त्याच्या कल्ल्यांनी उडवलेले धुरकट धुके त्यांच्याभोवती पसरले. अहाबने त्याचे शरीर मागे वाकवले आणि दोन्ही हात वर करुन त्याचा भयानक भाला त्या द्वेष वाटणाऱ्या मॉबी डिकच्या अंगात घुसवला! आणि त्याच्यापेक्षा अजूनही भीतीदायक शिव्याशाप दिले.

त्या पांढरा व्हेलने त्याचे अंग घुसळले व कडा लहान बोटीला घसपटून थोड्या वरखाली केल्या. ताफ्यातील तीन लोक समुद्रात फेकले गेले पण अहाब बोटीच्या आतल्या कडेला चिकटून राहिला.

जसा व्हेलने समुद्रात सूंबाल्या केला, अहाब लोकांवर किंचाळत बोलला, की त्यांनी मॉबी डीकला बांधलेली दोरी धरून ठेवावी. पण दोरीला ताण सहन होईना आणि ती रिकाम्या हवेत उडाली.

मॉबी डिक वळला व शीड सोडून असलेल्या पिक्वॉडच्या सर्व काळ्या भागाकडे नजर ठेवली. त्याला त्याचा त्रास होत असल्याचा विचार करून, त्याने जहाजाच्या पुढील टोकदार भागावर, त्याच्या जबड्याने धडक मारली.

डोक्यासकट शरीर वाकवून, वल्ही मारणारे लोक किंचाळले, “व्हेल! जहाज!”

अहाब रानटीपणे ओरडला, “जहाज, जहाज! तिरके करा. समुद्रात तिरके! अहाबला कडेने खाली एकदा शेवटचे त्याच्या भक्ष्यावर झडप घालायला जाऊ द्या. माझ्या खलाशांनो, पुढे चला! तुम्ही माझे जहाज वाचवणार नाही का?”

पिक्वॉडच्या डेकवर उद्दीपित होऊन, खलाशांनी मूर्खासारखे सतत मोठ्या वेगाने काहीही बोलायला व प्रार्थना करायला सुरवात केली. त्यांचे जादूभरे डोळे सरळ त्यांच्या अंगावर येणाऱ्या व्हेलवर खिळले होते. स्टारबक ओरडला, “ओहो, अहाब, तुझे काय चालले आहे? व्हेल आपल्यावर चालून येतो आहे. अरे देवा, माझ्याशेजारी उभा रहा, जबडा वासलेला व्हेल आपल्या सर्वांना गिळायची तयारी करतो आहे.”

मॉबी डिकच्या भरीव कपाळाने सूड घेत, जहाजाच्या उजव्या बाजूची दोऱ्यांची गाठ तोडली. माणसे वेडीवाकडी हलून चेहऱ्यावर निपचित पडली. पडलेल्या फटीतून पाण्याचा जोरदार प्रवाह वाहू लागला.

अहाब त्याच्या बोटीतून वर बघत ओरडला, “दुसरी प्रेतयात्रा! जहाजाचीच प्रेतयात्रा! याचे लाकूड फक्त अमेरिकन असले पाहीजे.”

ओहो, हे फेडल्लाहचे शब्द होते --- “अमेरिकन लाकडाची प्रेतयात्रा.”

व्हेल बुडणाऱ्या जहाजाच्या तळाच्या भक्कम भागाखालून निघून दूर निघून गेला व अहाबच्या बोटीपासून काही अंतरावर आला. क्षणभर तो व्हेल तिथे स्तब्ध उभा राहीला.

अहाब ओरडला, "मी माझे शरीर सूर्यापासून वळवतो. अरे पिक्वॉड, माझ्या मरणाऱ्या सुंदर जहाजा, तू तुटून माझ्याशिवायच मरणार का? माझा कप्तानाचा तोरा गळून पडणार का? माझ्या जहाजाबरोबर मीदेखील बुडणार का? अशा एकाकी जीवनानंतर माझे मरणसुद्धा किती एकाकी असेल! मी तुझ्याकडे येतो आहे. व्हेलला न मारता, सगळे नाश पावल्यावर! अरे भिकार व्हेल, शेवटपर्यंत मी तुझ्याशी लढेन, अशा तऱ्हेने मी तुला भाला मारतो!"

सर्व शक्तीनिशी अहाबने मॉबी डिकवर हार्पून फेकले. धक्का बसलेला व्हेल, हार्पूनच्या दिशेने वेडावाकडा हलत, गोंधळून, प्रकाशाच्या वेगाने पुढे निघून गेला. अहाबने पुढे वाकून खाली होत, दोरी खालीवर करत, त्याच्या मानेजवळ त्याला पकडले आणि तो बोटीतून उडाला. काय होते आहे हे ताफ्याला कळण्यापूर्वी, तो दोरीचा फास बसून मेला --- दोरीने त्याला मृत्यू आला.

क्षणभर ताफ्यातील माणसे अवाक होऊन, स्तब्ध झाली. मग ते वळले. जहाज? अरे देवा, पिक्वॉड कुठे आहे?"

धुक्यामधून त्यांनी पिक्वॉड जहाज सागरात बुडत असलेले पाहीले. विश्वासू हार्पून मारणारे अजूनही त्याच्या उंच शिडांवर नजर ठेऊन होते. एकच उरलेल्या बोटीला नंतर पाण्याच्या भोवऱ्याने खेचले व गोलगोल फिरवत

बसवले आणि त्यावरील सगळा ताफा, प्रत्येक वल्हे, प्रत्येक धारदार भाला व पिक्वॉडचा तरंगणारा प्रत्येक भाग --- सगळे काही सागराच्या तळाशी नेले.

महाकाय पांढरा व्हेल दूर निघून गेला.

आणि समुद्र जसा पाच हजार वर्षे उसळत होता, तसाच उसळत राहीला.

# प्रकरण १८

## एकटाच वाचला

गोष्ट संपली आणि मी एकटाच या संकटातून वाचलो.

मी भोवऱ्याच्या केंद्रबिंदूकडे खेचला जात असतांना, एक काळा बुडबुडा त्याच्या मध्यभागातून फुटला. त्यातून कॉफीनच्या आकाराचे काही वर येऊन, उघडले गेले व माझ्या बाजूने वाहू लागले. मरणानंतरही माझ्या सर्वात चांगल्या मित्राने माझे आयुष्य वाचवले. ती तरंगणरी वस्तू म्हणजे क्विक्वेगचे कॉफीन होते.

मी एक सबंध दिवस व एक सबंध रात्र त्यावर तरंगत होतो. शार्क माझ्या जवळून पोहत गेले पण मला काही केले नाही आणि रानटी समुद्र ससाणे, त्यांच्या चोची घट्ट बंद करून, माझ्या डोक्यावरून उडत होते.

एकाकीपणे त्या समुद्रातून जातांना, मी खूप विचार करत होतो. मी अहाबच्या मरणाला कवटाळण्याचा विचार केला. पांढऱ्या व्हेलच्या भीतीदायक उत्तर देण्याचा विचार केला. क्विक्वेगच्या दयाळूपणाचा, माझे धैर्य उंचावण्याचा विचार केला. त्याच्या छातीने मला सागरात तरून नेल्याची आठवण केली.

दुसऱ्या दिवशी एक जहाज माझ्या जवळजवळ येऊ लागले व त्याने मला शेवटी उचलून घेतले. ते फिरणारे राचेल जहाज होते. ते त्याच्या हरवलेल्या

खलाशांना अजून शोधत होते. पण त्याला फक्त मी इस्माईल हा अनाथ सापडलो.



The *Rachel* Rescues Ishmael.

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे पन्नास पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.


मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२११७४६२४५



सुखी जोडपे
व इतर कथा
सॉमरसेट मॉम
वृषाली जोशी


वृषाली जोशी
सॉमरसेट मॉम
आई व इतर कथा


सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
BEFORE
THE PARTY



सॉमरसेट मॉम
वृषाली जोशी


वृषाली जोशी यांची
एकोणपन्नास पुस्तके


























ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट



वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू



वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह



कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी



वृषाली जोशी
मार्क ट्वेन
मार्क ट्वेन च्या कथा


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov



वृषाली जोशी
लिकॉकबरोबर हसा
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


वृषाली जोशी
The
SOUND OF MUSIC
संगीताचा नाद


वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक


कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षाचे होत आहे.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे पन्नासावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे. अनुवादाचा तिनशे रुपये पर पेज हा रेट धरला तरी सुमारे तीस लाख रुपयांचे हे काम त्यांनी मराठी वाचकांसाठी विनामूल्य केले आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (**५०**), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(**५०**), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३५), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१४), श्याम कुलकर्णी(२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(५), अतुल देशपांडे,

लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी(४), यशवंत कदम(७), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखा्नीस(२), मिलिंद कपाळे मुकुंद कर्णिक (३) श्रीराम काळे (२) शैलेश पुरोहित(४) बी बी देसाई(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।